१
प्रभातातील जुने शिलालेख

१. नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या धुळे येथील 'प्रभात' मासिकपत्राच्या ९/१० ह्या जोड अकात शलुकिकांचा शके ७३५ तील एक ताम्रपट नवीन म्हणून छापला आहे. परंतु तो नवीन नसून Epigraphia Indica Vol. III p. 53 वर मागेंच छापलेला आहे.

२. ह्याच अंकात कटच्चुरी यांचा एक नवा व महत्त्वाचा ताम्रपट छापला आहे. त्याचे साल ३४७ हे चेदि संवत्सराचे आहे. शक सवत्सराचें नाही. कारण मंगलेश चालुक्य शक ५२० पासून शक ५३० पर्यंत राज्य करीत होता. शक ५२५ तील महाकूट शिलालेख ह्या मंगलेशाचा आहे व त्यांत कालगणना शक संवत्सरानें केली आहे. सबब ५२० पासून शक ५३० पर्यंत मंगलेश चालुक्य होता ह्याबद्दल शंका नाही. ह्या मंगलेशानें बुध्द कटच्चुरि याचा पराभव केला, असे शक ५२५ तल्या महाकूट शिलालेखांत म्हटले आहे. बुध्द कटच्चुरी याचा बाप शंकरगण. ह्या शकरगणाचा प्रभातात छापलेला प्रस्तुत ताम्रपट आहे. सदर ताम्रपटाचा संवत्सर ३४७ चेदि संवत्सर असून तो शक ५१७ श्रावण शुध्द पौर्णिमेबरोबर अथवा सन ५९५ च्या २७ जुलै बरोबर आहे. बुध्द कटच्चुरिचा पराभव शक ५२६ च्या अगोदर झाला. अर्थात् त्याचा बाप शंकरगण कटच्चुरि शक ५१७ च्या श्रावण शुध्द पौर्णिमेस हयात होता, हे स्पष्ट आहे. शकरगण हा मोठा पराक्रमी होता. सबब तो शक ५१७ नंतर मेल्यावर व त्याचा मुलगा बुध्द कटच्चुरि सिहासनस्थ झाल्यावर मंगलेश चलुक्याने त्याचा पराभव शक ५२५ म्हणजे चेदि संवत् ३५५ ह्या वर्षी केला.

३. रा. रा. चांदोरकर यानी प्रसिध्द केलेला हा शंकरगणाचा ताम्रपट इतिहास दृष्ट्या फार महत्त्वाचा आहे. शंकरगण कटच्चुरि याच्या काळी कटच्चुरी याचे राज्य पश्चिम समुद्रापासून पूर्वसमुद्रापर्यंत चालुक्याच्या राज्याच्या उत्तरेस पसरले होतें. म्हणजे गुजराथेतील कीम नदी पासून उज्जैन, वऱ्हाड, कन्ह-देश, नागपूर व तेलंगण अशा दिशेनें कटच्चुरी यांचें राज्य पसरलें होतें. त्यांच्या राज्याच्या उत्तरेस कनौजच्या हर्षवर्धनाचे साम्राज्य होतें आणि दक्षिणेस चालुक्यांचे राज्य नुकतेच झालेले होते. चांदोरकरांनी छापलेल्या ताम्रपटात शंकरगणाला "पूर्वापर समुद्रान्तादि देशस्वामी" असें विशेषण लावले आहे. तें यथार्थ आहे. ह्या "पूर्वापर समुद्रान्तादि देशस्वामी" विशेषणांत "अपरान्त" ह्या शब्दाची व्युत्पत्ती आहे. "अपरान्त" हा शब्द स्थूलमानानें कोकणाला लावतात. "अपरांत" म्हणजे "अपरसमुद्रांत" अन्त

म्हणजे प्रांत. अपरसमुद्र उर्फ अपर म्हणजे अरबी समुद्र. पश्चिम समुद्र तेव्हां अपरान्त म्हणजे पश्चिमसमुद्राच्या कांठचा प्रदेश.

४. शक १५० च्या सुमारात शातवाहनांचे विस्तीर्ण साम्राज्य नष्ट झाल्यावर शके १७० त कटच्चुरींनी चेदिदेशांत आपली स्वतंत्र सत्ता व शक स्थापिला. तेव्हांपासून शंकरगणापर्यंत म्हणजे शक ५१७ पर्यंत कटच्चुरिवंशांत कांहीं नामांकित राजे झाले. असे प्रस्तुत ताम्रपटांतील "विविधपुरुषरत्नगुणकिरणनिकरोवभातीते" ह्या विशेषणावरून उघड होते.

५. ह्या ताम्रपटांतील 'चिरोत्सन्नाना नृपतीवंशानांप्रतिष्टायिता' व 'अत्युछितानामुन्मूलयिता' ही पदे बहुतार्थप्रचुर आहेत. पडित झालेली राजघराणी शंकरगणानें पुन्हां स्थापिलीं व अति फोफावलेलीं मोडलीं, असें ह्या विशेषणात म्हटले आहे. तेव्हा अशी पडलेली व फोफावलेली घराणी शक ५१७ पूर्वी कोणती होती, ह्याचा उलगडा चादोरकरादिकांच्या भावी शोधानी होणार आहे.

क. हे. वि. मिरज मार्गशीर्ष वद्य १० शके १८३० - केसरी ता. २९ डिसेंबर १९०८.

●

२
बाहाळ येथील गढीवरील लेख

१. चाळीसगांवाच्या उत्तरेस पंधरा मैलावर बाहाळ म्हणून एक गाव गिरणेच्या काठी आहे. तेथील मोडक्या पडित गढीच्या दगड भिंतीवर खालील शिलालेख आहे.

१ श्री गणेशायनमः ।। श्रीमंत राजे -
२ श्रीराव केरोजी पंवार वीश्वासराव
३ जागीरदार प्रांत बाहाळ सुरसन सबै -
४न मया बलफ सन ११७९ सके
५ १६९१ विरोधी नाम संवत्सरे मार्गे -
६ स्वर शुध ८ अष्टमी माहाकाळ किले
७ मजकुरास कानूनविले विद्यमान
८ घनःशाम त्रिंबक फौजदार प्रा मजकूर
९ सरकार कसबे करमडू कारीगर
१० मौजे वाघळीची उत्तर.

२. शक १६९१ त केरोजी पवार बाहाळचा जागीरदार होता व घनःशाम त्रिंबक फौजदार होता. चाळीसगांवापासून १०/१५ मैलावर असणाऱ्या वाघळी गावाच्या कारागिरांच्या हातून किल्ला बांधवून घेतला. किल्ल्याचे नांव माहाकाळ. करमडू हे गांव चाळीसगावाच्या उत्तरेस वीस पंचवीस मैल आहे.

३. ह्याच गढीवर एक जुनें हेमाडपंती देऊळ आहे. त्यावर शक ११४४ चा यादवांचा एक संस्कृत शिलालेख आहे. तो छापलेला आहे.

●

३
पंढरपुरच्या विठोबाच्या देवळांतील चौऱ्यायशीचा शिलालेख

१. प्रस्तुत शिलालेख भगवानलाल इंद्राजीनें पाहिला होता व त्याचें त्रोटक वर्णन त्यानें सोलापुरच्या गझेटियरांत दिलें आहे. परतु एक दोन ओळी वाचण्यापलीकडे त्यांतील मजकूर त्यानें कांहींच दिला नाहीं. हा शिलालेख शक ११९४ त खोदला गेला असें तो म्हणतो; परंतु तसा प्रकार नाहीं. हा शिलालेख खोदण्यास प्रारभ शक ११९५ श्रीमुख संवत्सरीं झाला, व ११९९ त खोदणें समाप्त झालें. ११९५ च्या अगोदर दहा पांच वर्षें विठोबाच्या देवळाचा जीर्णोध्दार झाला व नवें देऊळ ११९५ च्या सालीं तयार झालें. शक ११९५ च्या नव्या देवळाच्या देवडीवर प्रस्तुत काली ज्याला चौऱ्यायशीचा दगड म्हणून म्हणतात तो होता असें वाटते. हे ११९५ तील देऊळ म्हणजे ज्यांत सध्यां विठोबाची मूर्ति आहे तो गाभारा होय. गाभाऱ्यावरील कळस बाळाजीपंत नातूनें चढविला आहे. गाभाऱ्यापुढील सोळखांबी व त्याच्या पुढील गरुड मंडप हे पेशवाईत व तिच्या अगोदर कांहीं वर्षें बांधले गेले. नामदेवाची देवडी चौऱ्यायशीच्या शिलेच्या किंचित् बरोबरची आहे.

२. चौऱ्यायशीच्या शिलेची लांबीरुंदी सोलापूर गझेटियरांत दिली असल्यामुळे ती येथें देण्याची जरूर दिसत नाहीं. शिलेवरील बहुतेक सर्व अक्षरें शाबूत आहेत. फक्त माथाच्या पहिल्या ओळीवरील दहा बारा अक्षरें व अधूनमधून कांहीं अक्षरे गेली आहेत. परंतु ही पहिली ओळ सर्व लेखांच्या शेवटली ओळ आहे. सर्व शिला लिहून झाल्यावर वर्गणीदारांची नावे लिहिण्यास जागा राहिली नाहीं, सबब प्रशस्तीचा जो पहिला श्लोक त्याच्यावरती ही ओळ खोदली आहे. सबद शिलेचे एकंदर आठ रकाने केले आहेत; व त्यात देवाच्या पूजेअर्चेकरितां पैसे व फुलें देणाऱ्या भक्तांची नांवे एकाखाली एक दिलेलीं आहेत. ह्या आठ रकान्यावरती

शिळेच्या सबंद लांबीभर तीन ओळी खोदल्या आहेत. पहिल्या ओळींत शेवटल्या वर्गणीदाराचीं नावे खोदलीं आहेत, म्हणून वरती सांगितलेंच आहे. दुसऱ्या ओळीत श्रीविठ्ठलाच्या प्रशस्तीचा एक संस्कृत श्लोक दिला आहे. आणि तिसऱ्या ओळीत खालील आठ रकान्यांत कशासंबंधी वर्गणी गोळा केली तें सांगितले आहे. एका रकान्याखेरीज करून प्रत्येक रकान्याच्या वरती ज्या पुढाऱ्याच्याकडे वर्गणीदारांनीं आपली वर्गणी भरली त्याचें नांव व खातें दिलें आहे. आठ रकाने व वरील तीन ओळी मिळून शिलेवरील लेखाची आकृती येणेप्रमाणें आहे.

१. शेवटल्या वर्गणीदाराची नांवें

२. प्रशस्तिपर श्लोक

३. मथळा

४. पुढाऱ्यांचें नाव रकाना १	पुढारी २	.... ३	.... ४	.... ५	.... ६	.... ७	.... ८

३. मूळ शिला चौकोनी असून, प्रस्तुत कालीं तिचा उजवेकडील वरचा व खालचा असे दोन्ही कोपरे फुटून गेलेले दिसतात. परंतु अक्षरें फुटून गेल्याचें किंवा वाक्ये तुटल्याचे कांहींच चिन्ह दिसत नाही तेव्हां कदाचित् सध्या जशी शिला दिसत आहे तशीच ती पूर्वीपासून असेल, असेहि मानण्याकडे प्रवृत्ति होते. शिळेवरील सर्व अक्षरें सारख्या आकाराची नाहींत. कांही अक्षरांचा व्यास १/८ इंच, काहींचा १/४ इंच, काहींचा १/२ इंच व काहींचा ३/४ इंच आहे. शक ११९५ पासून शक ११९९ पर्यंत पांच वर्षे जसजशी वर्गणी आली तसतशी वर्गणीदारांची नावें खोदलीं गेली, त्यामुळें अक्षरांचा आकार एका सांचाचा राहिला नाही. ह्या लहान मोठ्या अक्षरांचे वळण मात्र महाराष्टातील तत्कालीन इतर शिलालेखातल्या अक्षरांच्या सारखेच आहे.

४. प्रशस्तीतील श्लोकाखेरीज शिळेवरील बाकी सर्व मजकूर तत्कालीन मराठींत आहे. ज्ञानेश्वरानी आपली ज्ञानेश्वरी शक १२१२ त लिहिली; तिच्या अगोदर १२ पासून १७ वर्षे ही शिला खोदली जात होती. म्हणजे ज्ञानेश्वरीच्या भाषेची मापक ह्या शिलालेखाची भाषा समजणें रास्त आहे.

शिलालेख

[१](१) ++[२] [३]रूपवाडि [४]लाखणनयकें [५][६]दाम १ ++[७] दे [८]ॐ माइतिमालगोटी द। म १ +[९]+++++

+++ कुमारें [१०]वण्णैजे दत्तः म १ [११]देय दांडा १ [१२]फु.

[१३](२) स्तुत्यंनित्यमरोषसिध्दविबुधैः मूत्या विपृष्टं परं
श्रीकांतं कमलेक्षणं सुरगणैर्गेयं मुदा कोमलं ।-
कीर्त्यं भक्तजनै र्भृशं पुलकितानंदांबुपूर्णेक्षणै-
वंदे नंदतं[१४] मुदा घननिलं भक्तानुगं-श्रीविठ्ठलं ॥

(३) स्वस्ति[१७] श्री[१८] सकु[१९] ११९५ श्रीमुख[२०] संवत्सरे फागनिपुर

श्री विठल[२२]देवरायासि[२३] तिसासिति[२४] फुलें दांडे आचंद्रार्क चालावेआ
नाना भक्तिमालिआं[२६] दत्त पैकाचा[२७] विवरु[२८] ॥२९

रकाना पहिला

(४) मालि[३०] वामैआ[३१] दत्त[३२] षाते[३३] पैकु[३४] ॥

(५) १ श्रीपतिदे[३५] णाकें[३६] दत्त ग. १ देय दांड. फुलें १०० वौ.[३७]

(६) १ मांघोलि[३८] बाबा[३९] सेणवै[४०] दत्त ग. १ देय दां १ फु .+[४१] + वौ १

(७) १ गंगाधर[४२] नायकें दत्त ग. १ देय दां ३ फु. वौ.

(८) १ विजापूर[४३] गौरु - बाहूवा[४४] द। ग. १ देय दां. फुलें[४५]. वौ १

(९) १ माहूय[४६] नामदेवें द। ग १ देय दां १ सेवंत[४७] वौ १

(१०) १ कोकणा[४८] केंसवदेवें[४९] द। ग १ दे दां. १ फु. वौ.

(११) १ तबाषा[५०] अद्वेंते द। ग १ देयं दा १

(१२) १ मांइबाइ[५१] दामोधर भटीं द। ग २ वौ.

(१३) १ साहादेव[५२] पंडितीं द। ग १ देयं दां २

(१४) १ मुद्रहस्त[५३] सोमनाथें द। ग १ देयं[५४] दां. तुल[५५] वौ १

(१५) १ कुंभमूर्ति[५६] रुपदेवें द। ग देयं दां तुल वौ १

(१६) १ तथा सेमुवैल[५७] भूमिदेवें द। ग १ देयं दां १ तुल वौ १

(१७) १ बामरसाचा[५८] जोइसि[५९]नावैएं[६०] द। ग २ देयं दां २, वौ.

(१८) १ विद्याधर[६१] सरस्वति भटीं द। ग १ देयं दां १ वौ.

(१९) १ चल्हादेवी[६२] द। ग देय दा. फुलें २५

(२०) विठनायको[६३] विनायको देऊबाई दा ग १ देय दा. फुलें २५

(२१) १ कविठलीये[६४] सेता १ (दा) ग देय दां १

(२२) १ कामेगौ[६५] कान्हू[६६] नायकें द। खेतासो[६७] देय दां २

(२३) १ किरिकोम[६८] भत्कावें[६९] (दा) ग ६ देय दां ६ वौ.

(२४) छ[७०] आद्रुसवाडि[७१] सोंई दे ॐ पंडि

(२५) त मालि[७२] राघो द ग १ दे. तु वौ १

(२६) भाव[७३] संवछरे जेष्टमासे[७४]

(२७) १ आंवढा[७५] जाइदेवें[७६] दत्ता ग ४ देय दां १८

(२८) १ आंबेकारा[७७] दोंडं[७८] पंडीतु ग १ दांडा ३ फु २२

(२९) १ चांदोर[७९] रामेन सावऱ्हाप्री[८०] ग २ दांड १ ग्राहे[८१] १८

(३०) श्री विठलाचा[८२] फलखंड[८३] बा[८४] दामो + यरें[८५] द। द्रा[८६] १० दे फु १

(३१) सकु ११९८ धाता संवत्सरे माग वदि ३ वृषे[८७] सोडवी[८८]

(३२) कार हेमाडी[८९] पंडीतीं बामना[९०] दत्त ग १ देय दांडा १

(३३) स्वस्ति श्री सकु ११९९ ईस्वर संवछरे मार्गसिर सुदि १५ सुक्रे[९१] ॥ श्री विठलदेवराया-

(३४) सि पांडरी[९२] - फड - मुख्य समंतात्भाग आचंद्रार्क श्री - जादवनारायणप्रौढ - प्रता-

(३५) प-चक्रवर्ति श्रीरामचंद्रदेवराएं द। + +[९५] श्रीसर्वाधिकारी श्रीविठ्ठ

(३६) लदेवा मेहत्र[९६] ग[९७] क्षेर[९८] बलदेव बायकें[९९] बाव[१००] भहूसी[१०१] दत्त श्रीमंगलमहाश्री[१०२]

(३७) १ आंबेकोरें[१०३] क्रिष्णदेवें द। ग १ दे। फुलें ३०

(३८) भावसंवत्सरे[१०४] आस्विन सुघ १ रवौ श्रीविठ-

(३९) लदेवरायासि श्रीपतिदेवें[१०५] वकिवेकाए[१०६]

(४०) कें हस्तोदक करुनु[१०७] कशुत्रि[१०८] ग ५ महा

(४१) जना ग ५ ऐसे वक्रि[१०९]वेकारुक[११०] म ग द.....

(४२) त्त आचंद्रार्क हस्तोदयककृत

(४३) श्रीसकु ११९८ धातासंवत्सरे चइत्र[१११] सुध १५

(४४) सोमे हावुगल[११२] मलोदेवे[११३] द। ग १ आचंद्रार्क

(४५) नभमासे[११४] ललाम + + + +[११५] + + + +

(४६) नमेह[११६] द। + + + + + + तुलसीच[११७] बौस

(४७) र १ चंद्रार्क

(४८) सांगवी[११८] रामणुरी केसवसुत[११९] माधवदेवें

(४९) दत्त ग १ दे। फुलें २५

रकाना दुसरा

(५०)[१२०] पाटोलामातासुत[१२१] राघेण[१२२] दत्त षाते पैकु

(५१) १ श्रीपतिदें[१२३] णायकें[१२४] दत्ता ग. देय दां १

(५२) १ गंगाधर[१२५] नायकें दत्ता ग. देय दां १

(५३) १ लंनुसेठिं[१२६] दत्ता ग १ देय दां १

(५४) १ गणपति नायकें दत्ता ग १ दे। दां १

(५५) १ रविलेंद्र[१२७] गुद्रेन[१२८] द। ग १ दे दां १

(५६) १ पैठण[१२९] चांगदेवें[१३०] द। ग १ दे। दां १

(५७) १ कोटीन[१३१] हेमाडिपंडितें[१३२] द। (ग) १ दे दां १

(५८) १ तया[१३३] विहरे (स्वर)[१३४] देवें द। १ दे दां १

(५९) १ सिधनायकें[१३५] द। ग १ दे। दां १

(६०) १ मलिवा[१३६] तपोलालें[१३७] द। ग १ दे। दां १

(६१) १ उभेमार्ग[१३८] निंबदेवें द। ग १ दे। दां १

(६२) १ सालिवें[१३९] यादो[१४०] सेणवैएं[१४१] (द) ग १ दे। दां १

(६३) १ इस्वरस्वामी[१४२] पदि[१४३] द। ग ३ दे-फुलें ५००

(६४) १ आवडें[१४४] रासपंडितें[१४५] द । ग १ दे । दांडा १

(६५) १ आंघोली[१४६] जंतोविमाएं[१४७] द । ग १ दे । दां १

(६६) १ दांथिद[१४८] पेंदुमें[१४९] द । ग १०१ दे । दां १

(६७) १ पुराणिक हायोवाह्मा[१५०] ग. ॥ दे । सेव वौ १ तु वौ १

(६८) श्री सकु ११९८ धाता मार्गसिर बहुल[१५१] ५

(६९) १ रवौ श्री विठलेरावा[१५२] अर्थे द । दंडा[१५३] १ ग[१५४] ॥

(७०) १ गुरुवें[१५५] वाडदेवें[१५६] वाजसनेये सुतें चंगदेव[१५७]

(७१) १ सुतें दत्त माला पाच धह[१५८] गद्याण[१५९] १

(७२) १ ईश्वरदेवाचा म १ दंडा १ जैतको[१६०]

(७३) लपुविदेवाचा[१६१] म १ दंडा वे + ता

(७४) मांईदेवाचा[१६२] ग १ दंडा १ लपुमा

(७५) १ आपदें[१६३] पावीषोता[१६४] रणेरा घोडा[१६५] ग १॥ दांडा १

(७६) १ श्रीसिवनाथा[१६६] बोने[१६७] नित्य सातो[१६८]

(७७) पा.[१६९] ॥ गोधूमा पा. । तूपा. + हे पडि[१७०]

(७८) कोटारि[१७१] ठाकवो[१७२] तेयासि[१७३]

(७९) श्रीविठ्ठलाची[१७४] आण[१७५] [१७६]

(८०) १ पुरुषोत्तम पंडितिं ग १ पाटौला राघो दत्त ग १

(८१) आचंद्रार्क देयदांडा १ आहेचे[१७९] फुला[१८०]

(८२) १ मांईदे ॐ बांईआ[१८१] दत्त म १ दे. फु ४०

(८३) १ गोइंददेवे[१८२] दत्त ग १ दे. फु ४०

(८४) १ सेठवल[१८३] जाईदेवें दत्त ग १ दे. दांडा १

रकाना तिसरा

(८५) + + +[१८४] + + + + + दत्त पैकु

(८६) १ श्रीपतिदे[१८५] णायकें द। ग २ फुलें व १

(८७) १ गंगाधर[१८६] नायकें द। ग १ दें। दांड १

(८८) १ वासक[१८७] नायकें द। ग १ दे। दां १

(८९) १ देंपेरु[१८८] हलिकें[१८९] द। ग १ दे। दां १

(९०) १ एसरे[१९०] नरहरिएं[१९१] द। म १ दे। दां १

(९१) १ सिंवैएं[१९२] द। ग १ दे। दां १

(९२) १ पुजापुर[१९३] तानुबाहूणे द। म १ दे। दां १

(९२) १ तेलंग[१९५] विफ्फुराजें द। ग १ दे। दां १

(९२) १ सांये[१९६] बोपिसेठी[१९७] द। म १ दे। दां १

(९३) १ ह्लौसगी[१९८] जगदेवराणेन[१९९] (दा) म १ दे। दां १

(९४) १ पैठण चांगदेवें[२००] द। म १ दे। म १

(९५) १ कोहोर[२०१] हेमाद्रि[२०२] पंडि पंडि म १ दि दा १

(९६) १ संतिलाल[२०३] नारणना[२०४] द। ग १ दे। दां १

(९७) (१) चांमण[२०५] मांइनायकें द। ग १ दे। दां १

(९८) (१) अर्जुनभटी द। ग १ दे। दां १

(९९) (१) जैजवल[२०६] विक्फुदेवी द। म.। दे। तु वौ।

(१००) (१) रामेस्वर भटी द। ग.। दे। वौ १

(१०१) स्वस्ति श्री सकु ११९८ धाता संवत्सरे।

(१०२) असवन सुध १० सुक्रे कायतु[२०७] सग[२०८],

(१०३) हलोककीएं[२०९]

(१०४) द (।ग) १ तथाच[२१०] पुवुषे[२११] जगुदे ॐ ताहे[२१२] श्री

(१०५) विठलदेवरायासि वर्षप्रतिवर्दीं[२१३]

(१०६) देमा पुष्पासमाला[२१४] १ माषेता[२१५]

(१०७) दत्त म १ सोनेडा[२१६] + कर महाजना

(१०८) म १ पारेकार[२१७] राकेण[२१८] द। १ एकु[२१९]

(१०९) कुंभ विष्णुभटी ग १ रसमालि[२२०]

(११०) बींबके[२२१] ग १ मुद्रहस्त[२२२] सेणवै[२२३]

(१११) आ ग १ विपातता[२२४] ग १ भैरव

(११२) देव चांमप्रज्ञा[२२५] ग १। एवैम[२२६] १० ॥

(११३) छ्[२२७] आचंद्रार्क देया ॥

(११४) १ पुरुषोत्तम पंडितौ[२२८] विनायकी[२२९] वीरा

(११५) इया[२३०] मालो दत्ता दे। ग १ आचं-

(११६) द्रार्क देवा दाम्र[२३१] १ आहे[२३२] फुलं

(११७) १ मलीमालेवा[२३३] सहदेव

(११८) लघुमीदेवाचीवा[२३४] + सीरे

(११९) उघाडवा द। ग १ दे से[२३५] वौ १

(१२०) तथाचा[२३६] आम्ययक[२३७] वेसु

(१२१) आह्ल ॥ द। ग दे. से

(१२२) वौ १

(१२३) १ केतौर[२३८] प्रस[२३९] विठलदासें द।

(१२४) मालीमालासि[२४०] म १ दांडा १

(१२५) १ वैजाहसिं[२४१] श्रीविठला रा-

(१२५) यासी आचंद्रार्क व-

(१२६) लावेवा[२४२] दत्त म १ माले

(१२७) वा[२४३]

रकाना चौथा

(१२८) १ जाठीमासुत[२४४] राधा ग २ दत्त पैकु

(१२९) १ वाखें[२४५] नायकें द। ग २ दे. दां २

(१३०) १ गंगाधर नायकें द। ग १ दे। दां १

(१३१) १ अंधोलि[२४६] यत्रवेसि द। ग २ दे। दां २

(१३२) १ पैठण[२४७] चांदेवें द। ग १ दे। दां १

(१३३) १ त्रिवुरुस[२४८] गोविंदें द। ग १ दे। दां १

(१३४) १ एकुंठ[२४९] पुलेन[२५०] द। ग १ दे। दां १

(१३५) १ तंवरखेड[२५१] मोहूदें[२५२] द। ग १ दे। दां १

(१३६) १ ताटावाब[२५३] लोलबदेव (दा) ग २ दे। दां ३

(१३७) १ कोकणा माहादेवें द। ग १ दै दां १

(१३८) १ महादेवभटी द। ग १ दे। दां १

(१३९) १ श्रीपतिदण्णायकें द। ग १ दे। फुलें १००

(१४०) भावसंवत्सरे आषाड मासे + + १ ह[२५४]

(१४१) रुपदेवसुत तारदेवें दत्त ग १ ॥ दे। दां १

(१४२) पिषखडि[२५५] विहृत[२५६] वसत

(१४३) १ पुरुषोत्तम नायकें द। ग १ ॥ दे। दां १

(१४४) १ वैराग दांढीनायकें (दा) ग १॥ दे। दां १

(१४५) १ तथाचा दे +[२५७] देवें द। ग १। दे। दां १ - - -

(१४६) १ वीकटकाख्वा[२५८] द। ग १ फु २२

(१४७) १ मलिमालो[२५९] दत्त येकु ॥ करणिके[२६०]

(१४८) १ गिरिपंडितीं[२६१] पदुबाईया[२६२] ग १ दे। दां १

(१४९) १ रामंणदेवा[२६३] वर्तगीदेवें[२६४] द। ग १ दे। दां १

(१५०) १ विजापु[२६५] (र) एकदेवें द। ग १ दे। दां १

(१५१) १ श्रीपतिदें णायकें द। ग २ दे। फु २००

(१५२) १ बागरसी[२६६] करणीक[२६७] द। ग १ दे। दां १

(१५३) १ +[२६८] कुतु[२६९] पंडितकें द। ग १ दे। दां १

(१५४) १ विजापुर बळिदेवपंडितें ग १ दे। दां १

(१५५) १ तो +[२७०] + + पंडितीं द। ग १ दे। दां १

(१५६) १ गरजमाच[२७१] णिवासिं[२७२] गी[२७३] द। ग १ दे। दां १

(१५७) १ कोंकणा[२७४] गणपतिभटी (दा) ग १ दे। दां १

(१५८) १ केषदें[२७५] पंडितें द। ग १ दे। दां १

(१५९) १ मतुव[२७६] नायकें द। ग १ दे। दां १

(१६०) १ पडिवार कुद्रत्ति[२७७]द्दकें[२७८] द। ग १॥ दे। फु १००

(१६१) १ माहूदेवो विलेकिल[२७९]पुर द। ग १। दे। दां वौ १

(१६२) १ आबोलि[२८०] विरमदेवें द। ग १ दे। दां १

(१६३) १ नारण[२८१] नायकें द। ग १ दे। दां १

(१६४) १ बामरसा[२८२] सेणवै जादे[२८३]एं ग १ दे दां १०

(१६५) १ विजापुर ठामिदेव[२८४] पंडितें ग १ दे। दां १

(१६६) १ दोधीवा[२८५] माहादेवें द। ग १ दे। वौ १

(१६७) १ वाटौवा[२८६] राजौमिस्र्पाउ द। ग १ दे। दां १

(१६८) १ गाईतीआई[२८८] चेपण्ण[२८९]देउ[२९०] ठाकु

(१६९) क्रामुल्हाहू द। ग १ तस्य दांड

(१७०) देवा॥ वरानाफ[२९१]॥ १

रकाना पांचवा

(१७१) १ जाठौआसुत[२९२] मैना[२९३] दत्त पैकु

(१७२) १ रहू[२९४] पारसकें[२९५] द। ग २ दे। दां २

(१७३) १ कोंकणा महुसुदेव[२९६] द। ग १ दे। दां १

(१७४) १ लेवूगीदासी[२९७] दत्त ग १ दे। दां १

(१७५) १ कानोबा[२९८] दत्त ग १ देय दां १

(१७६) १ महदेव[२९९] भटि[३००] ग १ दे दां १

(१७८) १ कालिंद[३०१] शास्तमालेन[३०२] ग १ दे दां १

(१७९) कोंकण स्तुद्रस[३०३] द । ग १ दे । दां १

(१८०) १ माहादेव लघुबाया[३०४] ग २ फु ४० वौ २

(१८१) १ कादप[३०५] आपंणे[३०६] द । ग दे । दां १

(१८२) १ महदेव[३०७] पंडितें द । ग १ दे । दां १

(१८३) १ बोडवंग[३०८] भणयें[३०९] ग १ दे । दां १

(१८४) १ मुन्हुदे ॐ[३१०] लपुवा ग २ दे । दां १ तु वौ १

(१८५) १ ह्रौसाल[३११] लघुमोए[३१२] द । ग १ दे । दां १

(१८६) १ ईस्वर[३१३] स्व+भि द । ग १ दे । दां १

(१८७) १ भिवुदेव[३१४] पंडिति द । ग १ दे । दां १

(१८८) १ कालरबें[३१५] द । ग १ दे । वौ १ फु ५०

(१८९) १ मौलि वेसुनायकें द । ग १ दे । दां १

(१९०) १ बामुरसाचा सेणवै पितें ग १ दे । दां १

(१९१) १ पुजारिणीदासें द । ग १ दे । दां १

(१९२) १ देभरपेटि[३१७] द । ग १ दे । फुलें १००

(१९३) १ अंदरपेया[३१८] द । ग १ दे । फुलें १००

(१९४) १ भैरया[३१९] वौसास्तु[३२०] द । ग १ दे । तु वौ १

(१९५) १ युप्रचाति[३२१] मंवदि[३२२] द । ग १ दे । दांडा १

(१९६) १ दलवै[३२३] शिंबदेवें[३२४] दत्त ग १ दे । दांडा १

(१९७) १ भिंमोभार[३२५] हत्तीदेवें[३२६] द । ग १ तु वौ २

(१९८) धातासंवत्सरे[३२७] पोष वदि ३० के

(१९९) शबु[३२८] पंडितिं द। ग १॥ सिं १ दे। दां १

(२००) १ मंले[३२९] ओपास्तीदेवें[३३०] फुल १

(२०१) १ स्वस्ति श्री सकु ११९८ ध (ा)[३३१] ता बषढ[३३२] सुध ११

(२०२) भौमे दिवि लखुबाई[३३३] दत्त ग

(२०३) १। तुलसी वौसर १

(२०४) १ सेतुगुडेन[३३४] द। ग १ दे। दांड १

(२०५) १ मालिमालोवा[३३५] पैकु[३३६] १

(२०६) १ रागभोज्यनी नारायण श्री कु-

(२०७) वरदेवनायकें[३३८] द। ग १ दंडा १

(२०८) १ श्रीसकु ११९८ वर्षे आषाढ[३३९] बहुल ११ गु-

(२०९) रौ श्रीविठलराया श्रीपत[३४०] द। ग १ फुल १

(२१०) १ लखनायकें[३४१] सेंवति २५ तुलसी वौसर १

(२११) दत्त ग १ होण १॥। मालि[३४२]

(२१२) आचंद्रार्क ईस्वर संवत्सरे का-

(२१३) तीर्के सुधी १२

(२१४) लाहीलिदिं द --

(२१५) त्त ग १ दे। दां १

रकाना सहावा

(२१६) १ सेंडा[३४४] सेठेया[३४५] दत्त पैकु

(२१७) १ सांगाणदेव[३४६] १ ग देयदांडा १

(२१८) १ श्रीपतिदें णायकें द। ग २॥ दे। फुलें २५०

(२१९) १ गंगाधर नायकें द। ग ४ दे। फु ४(००)

(२२०) १ कोंकणें विष्णुभटें द। ग १ दे। दां १

(२२१) १ आमिदेवें[३४७] द। ग १॥ दे। दां १ ह वौ १

(२२२) १ मांइआ[३४८] द। ग १ दे। दां १

(२२३) १ हेबाभपेदि[३४९] द । ग १ दे । दां १

(२२४) १ मेहकर[३५०] नागंणें द । ग १॥ दे । दां. फु १०

(२२५) १ ब्रह्मसमुद्र[३५१]लिंभैयें[३५२] ग १ दे । दां १

(२२६) १ तथा बामंणें द । ग १ दे । दां १

(२२७) १ बामरसा वीकवकें द । ग १ दे । दां १

(२२८) १ वालेषाद्रि क्रेतुगौडे द । ग१दे । दां १

(२२९) १ बांषोलि वोलरें द । ग १ दे । दां १

(२३०) १ षेत्त + +[३५३] कुके द । ग १ दे । दां १

(२३१) १ ममतिज[३५४] २ द । ग २ दे । दां २

(२३२) १ भावसंवत्सरे[३५५] चैत्र सुदि १५ रवौ

(२३३) १ उभेमार्गी[३५६] तिंगवदेवें द । ग १ दे । दां १

(२३४) १ वणखेड महादेवपंडितिं द । ग १ दे । दां १

(२३५) १ भावसंवत्सरे[३५७] बास्विन सुदि रवौ

(२३६) मनुष्य[३५८] नायकें द । ग १ दे । दांडा १

(२३७) १ साहोये[३५९] फुलचौड भटिं द । ग १ दे । दां १

(२३८) १ श्रीपतिदेवीं[३६०] ग १ दे । दां १ आचंद्रार्क

(२३९) १ विष्णुदत्त[३६१] ग १ दे । तु वौ १

(२४०) १ हरिचंद्रे द । ग २ फुल वौ १

(२४१) १ दता[३६२] संवत्सरे कार्तिक सु १५ सुक्रे सु-

(२४२) लिमकरें[३६३] देवमालियें त (न) य[३६४] दत्त

(२४३) ग १ देय दांडा १ आचंद्रार्क

(२४४) १ मार्ग वदि ७ तपौ[३६५] काडबांग[३६६] १ देव

(२४५) षे दत्त ग १ सात[३६७] वौ २ आंव-

(२४६) मुकजेकारे[३६८] लषण्मिदेवें[३६९] द । ग १ दे । फु ३०

(२४७) १ मरवाडी[370] बादेवंण्णे[371] द । ग.।।

(२४८) १ कुक[372] सीवा वे ॥ १ आजन्मांतिके

(२४९) १ माली सेतेआ दत्ता ।।

(२५०) १ बव[373] धाता संवत्सरे कार्तिक सुध १ भौमे

(२५१) मेजक्षसिजोषाबा[374] देवमालिसेटिआ ग १म १दे--

(२५२) य दांडा १ पुत्रपौत्रीकीं आचंद्रार्क

(२५३) १ कुमरपदु[375] मैयणें तेणें दत्त ग १ ॥ देय दां-

(२५४) [376]

(२५५) १ सोमनायें द । ग १ दे । फुलें

(२५६) १ लितिलें द । ग १ दे । दां १

रकाना सातवा

(२५७) नामासुतु[377] हमेआ दत्त[378] पैकु

(२५८) १ कतवरमें[379] गणपति नायकें द । ग १ दे । दां १

(२५९) १ विजापुर पुरुषोत्तमें द । ग १ दे । दां १

(२६०) १ दामोधर पंढितें द । ग १ दे । दां १

(२६१) १ लाड[380] हरीदेवें द । ग १ दे । दां १

(२६२) १ नाराषतट[381] कालुगावें कारातें कोर्त

(२६३) र दोनिं देमा सुवता[382] दत्त ग. होण १

(२६४) १ धाता संवत्सरे कार्तिक सु १५ सुक्रे

(२६५) वदेस समंध[383] सीमुषेण[384] केसवें द । ग दे । दां १

(२६६) १ चौसठिणु[385] ताडाति[386] दत्त वृत्ति २ सी + + + +

(२६७) १ माधव आमण[387] दत्त ग १ देय दां १

(२६८) १ तरतु[388] मैआणसे[389] द । ग १ दे । दां. फुले ३०

(२६९) १ श्रीपतिद नायकें द । ग १॥ फुले २५०

(२७०) १ ममंती[३९०] द । ग १ दे । दां १

(२७१) १ देईवनी[३९१] सोवनी[३९२] वैजुगोदेव[३९३] मालो[३९४] लखुमण द । ग १

(२७२) सांदेआ[३९५] तुलसि वौसह १ आचंद्रार्क ॥

(२७३) १ फुगमु[३९६] कान्हो[३९७] राई आपा होण दे । दा ४० फु २५ वौ १

(२७४) १ भाव संवत्सरे वैसाख वदि ११ सुक्रे

(२७५) वेंकुण[३९८] मालो कानड द । ग १ देय दांडा १

(२७६) १ श्रीधरदासी सदसदसी[३९९] द । ग १ दे । दांडा १ वौ २

(२७७) १ देईपेदी[४००] द । ग १ दे । दां १ हेम -

(२७८) १ विलावाहुसुत[४०१] ह्यालैयापा[४०२] वौ १

(२७९) ह्यौसालेसरा[४०३] श्रीतिलखलभटी ग १ दे । दां १ आवांग

(२८०) १ सेंदुकार्ती[४०४] पेईदेव पंडितें द । ग १ + +[४०५]

(२८१) ती २५ तुल्सी वौसह १ आचंद्रा-

(२८२) र्क[४०६] दे ॥ धाता संवत्सरे मालिवासे ह देवमालि -

(२८३) णि विष्टा दत्त ग १ देय दांडा १ आचंद्रार्क

(२८४) १ माली[४०७] लखमणज संवंतासुत पेईदेवे द । ग १ दे । दां १

[२८५] [४०८]

(२८६) [४०९]

(२८७) [४१०] तुल्सी वौ १ आचंद्रार्क

(२८८) १ माहादेवें द । ग २ दे । दां २ आचंद्रार्क

(२८९) १ दोंरवठेकारे[४११] लटि -

(२९०) देवें द । ग १ दे । फु २०

(२९१) १ देमोदत्त[४१२] [४१३]

रकाना आठवा

४१५
(२९२) १ माधव मवाहआ

(२९३) दत्त ग १ देआ वौ १
४१६
(२९४) १ यादो मणसेण द।
४१७
(२९५) ग १ मालि मधाण

(२९६) ग १ मं.। आचंद्रा -

(२९७) र्क ॥ देय दांडा १
४१८ ४१९
(२९८) एल्हुबाईआ हिमो

१. खं ब्रह्मं निर्गुण प्रोक्तं रेषा हरहरिद्वयोः।
दकारात्स्नेहमाप्नोति यावल्लक्ष्मीः स्थिरा भवेत् ॥१॥

"शकनृपकालातीत संवत्सरशतेषु दशस्वेकोनपंचाशदभ्यधिकेशु प्लवंग संवत्सरान्तर्गत कार्तिक शुध्द पंचदश्यां शुक्रे यत्रांकतोपि सकु संवतु

२. १०४९ कार्तिक सुद १५ शुक्रे"........ तसेंच ग्रंथमालेच्या १३० व्या अंकांत छापलेल्या हंबिरराव यादवाच्या शक १२८९ तील शिलालेखांतहि सकु हें मराठी रूप आलें आहे.

३. शक १४९४ तील शिलालेखाच्या ३१ व ३२ ओळींवर 'सांगाव्या' असें रूप आले आहे; तें सांगावेआ या ज्ञानेश्वरकालीन रूपाचे एकनाथकालीन रूप आहें. तसेंच, नागांवातील शक १२८९ तील शिलालेखाच्या ७ व्या ओळीवर "ळावेया" असें रूप आलें आहे.

४. ह्या वरून स्पष्ट आहे कीं शक ११९५ त विठोबाचे आतांप्रमाणेंच असंख्य भक्तजन होते. ज्ञानेश्वर व नामदेव ह्यांच्यापासून पुढें विठोबाचें माहात्म्य वाढलें असा प्रकार नाहीं. ११९५ त ज्ञानेश्वर लहान पोर होते; तें वयांत आल्यावर विठोबाच्या असंख्य भक्तजनात शिरलें व आपल्या तपस्तेजाने भक्तशिरोमण्यांत अग्रगण्यत्व पावलें. भक्तिमार्गी भक्तजनांची छाप ज्ञानमार्गी ज्ञानेश्वरावर बेमालूम बसली.

मागें १०० व्या ओळींत केसव या शब्दांतील 'क' चें अनुनासिकीकरण होऊन कॆंसव असें रूप आलेलें आहे.

५. येणें प्रमाणें ह्या शिलालेखातील ३ ओळी आहेत. ह्याला चौऱ्यायशीची शिला किंवा दगड वारकरी लोक म्हणतात. का म्हणून शोध करतां, असें कळतें कीं, ह्या शिळेवर वारकऱ्यानें पाठ घासली असता तो चौऱ्यायशीच्या फेऱ्यातून म्हणजे चौऱ्यायशी लक्ष योनीत

जन्म घेण्याच्या खटाटोपांतून मुक्त होतो. परंतु ही शिळा अनेक शतके विठोबाच्या आवारातील, एका कोपऱ्यांत लोळत पडली होती; पुढे गेल्या पांच पन्नास वर्षापूर्वी कोण्या द्रव्यदृष्टि बडव्यानें तिला प्रस्तुत स्थळीं आणून तिच्यावर एका देवीची मूर्ति स्थापन केली, त्या मूर्तीला चौऱ्यायशीची मूर्ति म्हणून नाव दिलें, आणि जो कोणी मूर्तिची पूजा करील व शिळेवर पाठ घाशील त्याचा चौऱ्यायशीचा फेरा चुकेल अशी अफवा उठविली. जी भाविक वारकऱ्यांना फारच पसंत पडली. हें एक कारण झालें. दुसरें एक कारण असें देतात कीं, ह्या शिलालेखाच्या प्रारंभी शकाचा जो ११९५ चा आंकडा आहे त्यातील ९५ अनभ्यस्त वाचकाला ८४ सारखे दिसतात. पांचाचा आकडा अर्धवट उमटल्यामुळें तो चारा सारखा दिसतो व १२ व्या शतकांतील नवाचा आकडा प्रस्तुतकालीन अनभ्यस्त वाचकाला सध्याच्या आठासारखा दिसतो. त्यामुळें शक ११८४ ची शिळा अथवा संक्षेपानें चौऱ्यायशीची शिळा असे नांव प्रचलित झालें. ह्या कारणांत बराच सयुक्तिकपणा दिसतो. तिसरें एक कारण असें देतात कीं, ह्या शिळेवर प्रथम चौऱ्यायशी नामांकित वर्गणीदारांची नांवें खोदिलीं गेलीं. त्यावरून चौऱ्यायशी पुण्य पुरुषाची शिळा अथवा संक्षेपानें चौऱ्यायशीची शिळा अशी प्रख्याति ह्या दगडाची झाली. हेहि कारण दुसऱ्या इतकेच कदाचित् त्याहूनहि जास्त सयुक्तिक आहे. परंतु आठी खात्यांतील एकंदर नांवे पहांता तीं चौऱ्यायशीच्या दुपटीहूनहि जास्त आहेत. तेव्हा हेही कारण पूर्णपणे सयुक्तिक दिसत नाहीं. ह्यापैकी सगळींहि कारणें खोटीं असलीं, तरी सध्या ह्या दगडाला चौऱ्यायशीचा दगड म्हणतात, हे मात्र खरें आहे व ह्याच्या उत्पन्नावर एका ब्राह्मणाचें पोट चालतें हें निर्विवाद आहे. शिळेवर लाखो लोक पाठी घाशीत असल्यामुळें व वरल्या देवीला धूप, दीप, नैवेद्यहि समर्पण होत असल्यामुळे घामाचें व तेलाचे बोट बोट कीट मी गेलो त्यावेळेस चढलें होते. शिवाय उजव्या व डाव्या अशा दोन्ही बाजूला अर्धी अर्धी वीत शिळा भिंतींत गाडून गेली होती; आणि माथ्याला व पायथ्याला शेंदराचा व तेलाचा भक्कम गिलावा झाला होता. भगवानलाल इंद्राजीने लेख पाहिला तो ह्या अशा स्थितींत पाहिला. भगवानलालाच्या पुढें दोघातिघानी ह्याचे फोटो घेतले, तेहि ह्या अशाच स्थितीत. ह्या शिळेचा एक फोटो बडवे व बेणारी यांच्या खटल्यांत कोर्टापुढें पुराव्याकरितां नेला होता. समजूत अशी कीं; ह्यांत बडव्याच्या किंवा बेणाऱ्यांच्या पूर्वजाचें नांव असावे. परंतु, कोर्टाला, वकिलांना किंवा फोटो काढणाऱ्यांना लेखांतील अक्षराचा बोध झाला नसल्यामुळें; लेखाचा काहींच उपयोग झाला नाहीं. लेखांतील कांही नांवें बडव्याच्या व बेणाऱ्यांच्या पूर्वजांची असू शकतील. परंतु ह्या दोघांच्याहि वशावळी सात आठशे वर्षाच्या सापडल्या पाहिजेत. अख्यायिका अशी आहे कीं, बडवे व बेणारी दुर्गादेवीच्या दुष्काळानंतर आले. कारण दुर्गादेवीच्या दुष्काळानंतरचे कागदपत्र ह्यावर लोकाजवळ आहेत; आधींचे नाहींत. पण ह्यावर अशी एक शका येते की; दुर्गादेवीच्या दुष्काळापूर्वीं ह्या देवळात बडवे व बेणारी असलेच पाहिजेत. बडवे व बेणारी ही दोन्ही नांवें सात आठशे वर्षाचीं जुनीं दिसतात. बडवे हा शब्द बडवै, बडवइ, बडपति अशा परंपरेनें बडपति ह्या शब्दापासून निघालेला दिसतो. बड ह्या शब्दाचा अर्थ शालिवाहनाच्या बाराव्या शतकांत स्तुति असा होता. ह्याच

बडधातूपासून बडबड, बाड वगैरे शब्द निघाले आहेत. एवंच बडवइ, बडवै, बडवे म्हणजे स्तुतिपाठक होत. त्याचप्रमाणें बेणारी हा शब्द वेणुहारी, वेण्हारी, बेणारी ह्या परपरेनें वेणुहारी ह्या शब्दापासून उपजलेला आहे. असे हे दोन्ही शब्द फार जुने आहेत. अर्थात् ह्या आडनांवाचे लोकहि तितकेच जुने कां नसावेत हे सांगणें मुष्किलाचें आहे.

६. आतांपर्यंत सांपडलेल्या मराठी लेखांत, पोथ्या, कागद, ताम्रपट व शिलालेख ह्यांत हा लेख बराच जुना आहे. ह्याहून जुने असे मराठी शिलालेख एक दोन आहे. ते मी लवकरच प्रसिध्द करणार आहे; व नंतर ह्या सर्वांच्या भाषेसंबधानें संकलित असें एक टिपण करावे असा बेत आहे. तोपर्यंत मला जी अक्षरें लागली नाहीत व दुसऱ्या कोणाला लागतील; कित्येक स्थलीं मी शब्दाचे जे अर्थ केले आहेत. त्याहून उत्तम अर्थ दुसरा कोणी करील; आणि ह्या सगळ्याचा फायदा आणीक जुने लेख वाचण्याला होईल.

७. शक ११९५ त रामचंद्र यादव किंवा जादव राज्य करीत असतां, विठोबाच्या देवळाची मोठी चलती होती, हें ह्या शिलालेखांतील देणग्यावरून स्पष्ट आहे. यादवांचें राज्य शक १२३९ त गेल्यावर नामदेव, गोरा कुंभार, सांवता माळी वगैरे कनिष्ट प्रतीच्या लोकाच्या हातीं हे देऊळ गेले असें दिसतें. पुढें शंभर दीडशें वर्षांनी यवनांनीं ह्या देवळाचा व आंतील मूर्तीचा भंग करण्याचा प्रयत्न केला; तेव्हां अनागोदी येथील तत्कालीन राजानें विठोबाची मूर्ति हंपास नेली व तिची स्थापना त्या शहरीं केली, अशी एक लोकवार्ता आहे. ही लोकवार्ता खरी आहे असे हंपी येथील खालील शिलालेखावरून दिसून येते.

स्वस्तिश्री विजयाभ्युदय शालिवाहन शक वर्ष १४३५ नेय श्रीमुखिसंवत्सर चैत्र शुध्द ५ यल्लू श्रीमन्महाराजाधिराज परमेश्वर गल्लू वीरप्रतापश्री + वीरकृष्णराय महारायातू श्रीठिल देवर अमृतपडि नैवेद्यके अंगरंग वैभोग फाल्गुण मासदरथोत्सव नित्योत्सव पक्षोत्सव मासोत्सव संवत्सरोत्सव नित्यनैवेद्यादिदीपाराधान मदलाद पुण्यतिथीगळल्लि महापूजा महानैवेद्यके समर्पिशद हुलगी मागाणीन हरिहर पुरग्राम १ वदु होसूर मागणी वळगिन विरुपाक्षहग्रामवंदु १ मोसलहासि केवळ गाद गोडीवळागिनगट्ट बीजवरीपचशी मी वळगिन गोपीशदियहळेग्राम १ अंतूग्राम ३ गोडीतेलगिनघट्टी बीजवरी मोहोरीग्राम गळिगेसल्लुव तळवारिकी सुकजूडी बिराडा साम्य सकलसंवर्गादाय सकल भत्तादायवु उंटादवु नम्म तंम्मदि नरसण्णनायक वडियरिग्यू नम्म नायिगळु नागलादेवी अम्मनवरिग्यूई धर्मवागि सूर्यग्रहण पुण्यकालदल्लि सर्वमान्यावागि आचंद्रांकस्थायि आणि नडियुवमर्यादियागि धारापूर्वक वागि समर्पिशि श्रीकृष्ण महारायर पषदेवि यरुचिन्नादेवि अम्मन तिरुमलादेवि अम्मनवरु श्रीविठल देवरिगे गोपुरकादिशिदेव नैवेद्य आरोगणिदूदयचित्तैसुवदक्के समर्पिशि द चित्रदहरिवाण १ कव्विणतूक ११९० बेळीनीरांजनद हलिग्यार्ति ९ वंटि आरुती ८ पुरुषमृगद आरुती ३ नागावरु १ धूपार्ति १ प्रतिमार्ति १ अंतू २५ आरुतीदीपाराधनिगे समर्पिशद हासलुई २०० माडशिद्दन्न आचंद्रार्क स्थायि आगिनडियोदु ई धर्म आरु तण्णिदवरु व तम्मत दियन्नुवारा णाशीयल्लिका दवरपापके होरगुवतू गोहत्या-ब्रह्महत्यामाडिदपाप क्केपात्ररागुवरु ॥ मगल श्रीः ॥१३॥छ

८. ह्या शिलाशासनावरून असें दिसतें कीं, शक १४३५ श्रीमुखनामसंवत्सराच्या पूर्वीं वर्षे

दोन वर्षे पंढरपुराहून विठोबाची मूर्ति विजयनगरच्या कृष्णदेवानें आणून हंपीस स्थापन केली. त्यावेळी एकनाथाचा आजा भानुदास चांगला वयांत आलेला असावा. पुढें यवनांची क्रूरदृष्टि किंचित् कमी झाल्यावर भानुदासानें हंपीहून ती मूर्ति परत आणिली असावी. कर्नाटकांतील इतर मोठमोठ्या क्षेत्रांतून विठोबाचीं देवळें फारच विरळा आढळतात. प्रख्यात असें विठोबाचे देऊळ हंपीसच तेवढें एक आहे. तें कृष्णदेवानें शक १४३५ त बांधून त्याच्या अर्चेची व उत्सवाची व्यवस्था लावून दिली. हंपीच्या देवळांत पंढरपुराहून नेलेली विठोबाची मूर्तिच बसविली किंवा दुसरी एखादी मूर्ति बसविली ह्याचा निश्चय भानुदासाच्या हकीकतीवरून करतां येतो. भानुदासानें विठोबाची मूर्ति परत आणिली ही गोष्ट जरी खरी मानिली, तर हंपीच्या देवळांत दुसरी एखादी मूर्ति बसविली असावी असेंच मानणें भाग पडते.

९. पंढरपुरच्या विठोबाच्या मूर्तीला शक १४३५ च्या पुढें दुसरे मोठें गंडांतर शक १५८१ त अफजलखानाच्या हातें येण्याचा समय आला होता. परंतु असें सांगतात की बडव्यांनी ऐन वेळीं मूर्ती पंढरपुराहून वीस मैल असणाऱ्या माढें गावीं नेऊन ठेविली. पुढे अफजलखानाचा वध झाल्यावर, ती मूर्ती परत आणिली; व ह्या गंडांतराच्या स्मरणार्थ माढ्यास विठोबाचे एक स्वतंत्र देऊळ व मूर्ति स्थापण्यांत आली.

१०. अफजलखानानंतर विठोबाच्या मूर्तीला तिसरे गंडांतर, अवरंगझेब पढरपुरापासून १५ मैलांवर असणाऱ्या माचनूर नामक गावी येऊन राहिला तेव्हां, येण्याचा समय आला. त्यावेळी प्रल्हाद बडव्यानें मूर्ति जवळच्याच एका गावीं नेऊन बचाविली.

११. मूर्तीला चवथे गंडातर २५ वर्षापूर्वी एका माथेफिरु वैराग्याच्याद्वारा आलें होतें. त्या पुढें आजपर्यंत विशेष काही गंडांतर आलेलें नाहीं.

१२. पंढरपूरच्या विठोबाची मूर्ति १५०० किंवा १६०० वर्षांची जुनी असावी असें अनुमान आकार, अलंकार, ढब व ध्यान ह्यांवरून भगवानलाल इंद्राजीनें काढलें आहे. पंधराशे किंवा सोळाशे वर्षांचा पदार्थ मूर्तीखेरीज दुसरा पंढरपूरच्या देवळांत नाही. ज्ञानेश्वर व हेमाद्रि यांच्या अगोदर पुंडलीक झाला. त्याच्या आईबापांची नावें शुध्द मराठी आहेत. ती पंढरीची राहणारीं होती. चौऱ्यायशीच्या शिलेच्या अगोदरच्या एका लेखात पुंडरीकाचे नांव व गोष्ट आलेली आहे. हा अगोदरचा शिलालेख चौऱ्यायशीच्या शिळेच्या पूर्वी ३० / ४० वर्षे खोदला गेला होता. तेव्हा जर पुंडरीकाची गोष्ट कथारूप झालेली होती तर पुंडरीकाला लौकिकांत संतपणा प्राप्त होऊन बरीच म्हणजे पांच पन्नास कदाचित् शंभर दीडशे वर्षें झाली असली पाहिजेत. म्हणजे पुंडरीक शक ११५० च्या पूर्वी पन्नास शंभर वर्षे झाला असला पाहिजे. पुंडरीकाचा समय शक १०७५ धरला तर युक्तीला फारसा बाध येईल असें वाटत नाहीं. पुंडरीक हा अर्वाचीन मराठी, संत मंडळांतला पहिला होय. त्याची समाधि व त्याच्या मातापित्यांच्या समाधी सध्या पंढरीस वाळवंटांत आहेत. त्यावरून हा ऐतिहासिक पुरुष होता ह्यांत संशय नाही. "पुंडलिकवरदे हरिविठ्ठल' हा पुडलिकाच्या नांवाचा गजर समाराधनांतून दररोज गांवगन्ना अठरा पगड जातींत दुमदुमत आहे. अभंग, ओवी, आर्या, श्लोक, चरित्र, भूपाळि, सस्कृत शिलालेख वगैरे

नाना स्थली ह्या भगवद्भक्ताचे नांव पदोपदीं आढळत आहे. अशा ह्या महान् पुरुषाचा काल ठरविणें अत्यत अगत्याचें आहे.

१३. विठोबाच्या मूर्तीची विटेवरती मूळ स्थापना पुंडरीकानें केली, अशी एक लोककथा आहे. ती जर खरी धरिली तर श्रीविठ्ठल हें दैवत् शक १०७५ च्या सुमारास पंडरपुरी पुंडरीकाच्या हस्तें स्थापलें गेलें असे म्हणणें सभाव्य होते. शिवाय विठ्ठल हा शब्द काही शुध्द सस्कृत नाहीं; इतकेच नव्हे तर शुध्द जुना प्राकृतहि नाहीं. बंगाली, मराठी वगैरे अर्वाचीन गोडी भाषा प्रचलित होत असतां हा शब्द तयार झालेला आहे. ह्या भाषा शक ९०० च्या सुमाराला जुन्या प्राकृतापासून चांगल्या भिन्न होत चालल्या होत्या. अर्थात्, त्यानंतर थोड्याच अवकाशानें पंढरीच्या विठ्ठलाची स्थापना अर्वाचीन पहिला मराठी संत जो पुंडरीक त्या हातून साध्या विटेवर झाली आणि नंतर विठोबाचें माहात्म्य हळूहळू वाढत जाऊन सामान्य भक्तजनाबरोबर देवाच्या पूजेअर्चेकरितां वर्गणीदाराच्या पटांत कोठेहि आपलें नांव खोदूं देण्यात रामदेवराव जाधवासारखे चक्रवर्ती राजेदेखील परम भूषण मानू लागले.

संदर्भ

१. ही ओळ शिळेच्या सबंद लांबीभर खोदली आहे. आठव्या रकान्यांत वर्गणीदारांचीं नावें, खोदून शिळेवरील जागा संपल्यावर, नंतर प्रशस्तीच्या वरील जागेवर ही ओळ खोदिली आहे. प्रशस्तींतील अक्षरांपेक्षा ह्या ओळीतील अक्षरें निम्यानें बारीक आहेत. दगडाचे कवचे निघून जीं अक्षरें अजीबात नाहींशीं झालेलीं आहेत त्याच्या बदला, अदमासाने जितकीं अक्षरें फुटून गेलीं असें वाटलें, तितक्या फुल्या घातल्या आहेत. ही ओळ सरासरी चार फूट लांब आहे.

२. ह्या दोन फुल्यापैकीं पहिल्या फुलीच्या जागीं एकाचा आंकडा घातलेला आढळतो. दुसरी फुली रुपवाडि ह्या ग्रामनामाच्या पहिल्या अक्षराच्या बदला आहे. कदाचित् तें अक्षर सु असेल. म्हणजे गांवाचे सबंद नाव सुरुपवाडि होतें.

३ "रुपवाडि लाखणनायकें" असा आहे. कर्नाटक, तैलंग, वगैरे देशांत तन्नामधारी इतर व्यक्तींपासून भेद दाखविण्याकरितां व्यक्तीच्या नांवापाठीमागें गांवाचें नांव जोडतात. तोच प्रकार शक ११९५ च्या सुमारांस महाराष्ट्रांत प्रचलित होता असें दिसतें. ज्या अर्थी "रुपवाडि" व "लाखणनायकें" ह्या शब्दाच्यामध्यें विभक्ति प्रत्यय नाहीं, त्या अर्थी हे दोन शब्द मिळून एक सामासिक पद धरणे प्राप्त आहे.

४. "लाखण" हें लक्ष्मण शब्दाचे प्राकृत रूप आहे. नायकें ही तृतिया आहे. ह्या शिलालेखांत पुल्लिंगी अकारात नामाच्या तृतीयेचें एकवचन ईं हा अनुनासिक प्रत्यय लावून होतें.

५. 'दा१ = दत्त: अथवा दत्त. सक्षेपाचें चिन्ह आतांच्याप्रमाणे त्यावेळीहि। अशी उभी रेघ होती. कोणत्याहि शब्दाचा संक्षेप शब्दाचें आद्याक्षर व उभी रेघ यानी दर्शवीत.

६. 'ग' हें अक्षर गद्यान शब्दाचा संक्षेप आहे. हा सक्षेप कधीं नुसत्या 'ग' नें व कधीं 'ग०' नें दाखवीत. म्हणजे ० शून्यानेहि सक्षेपाचे सूचन होत असे. गद्यान हे एक तत्कालिन सोन्याचें

किवा रूप्याचें नाणें होतें. सध्यां गुजराथेंत गध्यान, गध्दा नांवांची नाणीं अद्यापहि ऐकण्यात येतात. येथें सोन्याचा गद्यान विवक्षित आहे किवा रुप्याचा आहे, तें निश्चयानें सांगता येत नाही. बहुश: सोन्याचा असावा. कारण गद्यान देणारा गृहस्थ नायक म्हणजे अधिपति आहे. गद्यानाचें वजन एक तोळा असून, किमत १५ किंवा १५॥ रुपये असे.

७. ह्या दोन फुल्या 'फु.' ह्या दोन अक्षराबद्दल बहुश: असाव्या असें पुढील सदर्भावरून वाटतें. 'फु' म्हणजे फुलें शून्य. एकंदर वाक्याचा अर्थ असा:- रुपवाडि येथील राहणाऱ्या लाखणनायक सावकारानें सोन्याचा १ गद्यान दिला; फुले मुळीच दिलीं नाहीत.

८ देओमाइ = राजाची आई. दे ॐ माइ= देवमातृ. त्रिमाल= त्रिमल्ल. गोष्टी= समुदाय. तिमालगोष्टी नावाची राजमाता. हिनें एक गद्यान दिला. ही लाखणनायकाची आई दिसते.

९ ह्या ९ फुल्यांच्या जागी पुढील शब्द असावे. देय दांडा १ फुलें ०.

१०. १० कुमार = राजपुत्र. वण्णैजे = वण्णैजानें. वण्णैज हा लाखणनायकाचा मुलगा दिसतो. वण्णैज = वर्णयज.

११. दांडा = फुलांचा झुबका, तुरा अथवा काठी.

१२. कुमार वण्णैजाने एक गद्यान दिला; त्याच्या सचर्नि एक दांडा द्यावा आणि फुलें मुळीच देऊं नये.

१३. ह्या दुसऱ्या ओळींत पुढील सबंद प्राशस्तिक श्लोक खोदिला आहे.

१४. 'नंदत' ह्या तीन अक्षरांऐवजी 'नंदसुतं' अशी चार अक्षरें हवीं होती.

१५. श्री हें अक्षर वृत्तदृष्ट्या फाजील आहे. परंतु विठ्ठल या नावापाठीमागें श्रीलावण्याची वहिवाट पडल्यामुळे या चवथ्या चरणांत श्री ढकलून दिली आहे. वृत्तसुखापेक्षां भक्तिसुखाकडे लक्ष विशेष आहे.

१६. विठ्ठल ह्या शब्दाचें खरे रूप विठ्ठल. गौड भाषांत विष्णु या शब्दाचें विठ्ठ; व कृष्ण या शब्दाचे किट्ट किंवा क्रिष्ट अशीं रूपे होतात. विठ्ठु या शब्दाचें प्रेमळरूप विठ्ठल. त्याच्या सामान्यजनांच्या बोलण्यांतील व्यावहारिक उच्चार विठ्ठल. विष्णु हा शब्द नामदेव विठ्ठलाला सदा लावतो व स्वत:ला विष्णुदास आग्रहानें म्हणवितो. विष्णु, विठ्ठु, विठोबा, विठाई, विठ्या, विठ्ठल, इठाल, इटाल, ठाल, विठाबाई असे एकंदर १२ उच्चार ह्या नांवाचे साधुसताच्या ग्रंथांतून व पंढरीच्या यात्रांतून ऐकूं येतात.

१७. शिळेच्या ह्या तिसऱ्या ओळींत 'स्वस्ति' पासून 'विवरू' पर्यंतचा सबंद मजकूर खोदला आहे. मजकूर संपल्यानंतर जो भाग राहिला त्यावर एका वर्गणीदाराचे नाव खोदलें आहे.

१८. 'स्वस्ति' शब्दाच्या पूर्वी ॐकार किंवा ६ दकार प्राय: बऱ्याच शिलालेखांवर सापडतो. ॐकाराचा अर्थ काय तें सर्वत्र महशूर आहे. दकाराचा अर्थ इतका प्रसिध्द नाही. सबब तो येथे देणे योग्य होईल असे वाटतें.

१९. 'शक' च्या बद्दल सकु हें मराठी रूप महाराष्ट्रांतील इतर कित्येक शिलालेखांत व ताम्रपटांतहि येते. प्रो. काशिनाथपंत पाठक ह्यांनी मुबईच्या आशिआटिक सोसायटीच्या २१ व्या खंडाच्या ५९ व्या अंकांत-१९०४ त प्रसिध्द केलेल्या-शक १०४९ चें शिलाराचें एक

ताम्रपट छापलें आहे. त्यात खालील शब्द आहेत.

२०. मूळात 'ख'च्या ऐवजी 'ष' खोदला आहे.

२१. पंढरपुराला फागनिपूर असें दुसरें एक नाव होतेसे दिसतें. परंतु, आतापर्यंत जेवढे म्हणून ज्ञानेश्वरापासून महीपतीपर्यंत साधुसंत झाले तेवढ्यांच्या ग्रथांत किंवा इतर ताम्रपट, शिलालेख, संस्कृतग्रंथ किंवा प्रशस्त्या ह्यांत फागनिपुर असे एखाद्या गांवाचे नांव आढळांत आलेलें नाहीं. 'फागनि' हें फाल्गुनि ह्या संस्कृत शब्दाचे प्राकृत रूप आहे. फाल्गुन महिन्याला हिंदी भाषेंत फागन म्हणतात. फाल्गुनि हें सध्यांचे पंढरपुर व गोपाळपूर यांच्यामधील ओढ्याचे अथवा नदीचे नांव असावें. त्या ओढ्याच्या जवळ असणारें जे गांव तें फागनिपुर. परंतु फागनिपुर हे नाव पंढरपुर ह्या नांवापेक्षा फार जुने दिसतें, इतके जुनें कीं ११९५ त प्रौढ भाषेनें गावाचा नावाचा उच्चार करावयाचा असला म्हणजे पंढरी, पंडरिगे, पंढरपुर ह्या सापेक्षतेनें आधुनिक नांवाना टाकून, फागनिपुर असे जुनें अतएव प्रौढ नाव उच्चारीत व लिहीत. बाकीं शक ११९५ त फागनिपुराचें लौकिक व व्यावहारिक नांव 'पंडरिगे' होते, असें म्हणण्याला आधार आहे. विठोबाच्या देवळातील सोळखांबोच्या पुढें गणपतीच्या पुढील दोन खांबांवरील एका आडव्या शिलेवर तिन्ही बाजूनीं कोरलेला एक लेख आहे; व चौऱ्यायशीच्या शिळेच्या पांच पन्नास वर्षें पूर्वीचा आहे. त्यांत श्री विठ्ठलाचें देऊळ ज्या गावांत आहे त्याला पंडरिगे म्हणून म्हटलें आहे. म्हणजे ११९५ च्या पूर्वीपासून ह्या गावाचे नांव पंडरिगे असें होतें हें उघड आहे. हिपरगे, कवलगे, बिळगे, वगैरे कर्नाटकी ग्रामनामाप्रमाणेच हे पंडरिगे नाव कानडी आहे. त्यावरून "पंडरिगे विठाबाई। मला ठाव द्यावा पायी ॥" ह्या अभगांतील "पंडरिगे विठाबाई" ह्या शब्दाचा अर्थ यथास्थित लागतो. "पंडरिगे विठाबाई" म्हणजे "पंडरिगे गावची विठाबाई" त्रावणकोर माधवराव, ताजोर गोपाळराव, कुंभकोण वामनराव वगैरे कर्नाटकी समासाप्रमाणेंच पंडरिगे विठाबाई हा एक समास आहे. "पंडरिगे विठाबाईचा", "पांडुरंगे विठाबाई" असा वारकरी लोकांनी अलीकडे अपभ्रंश केलेला आहे. कारण पंडरिगे व पांडुरंग हे दोन शब्द उच्चारण्याला जवळजवळ भासतात. पंडरिगे ह्या कानडी शब्दावरून शास्त्री लोकानी पांडुरंग हे संस्कृत नाव तयार केलें, असें भगवानलाल इंद्राजी म्हणतो; व हें त्याचें म्हणणे सकृद्दर्शनी साधार दिसतें. पांडुरंग म्हणजे गोऱ्या कातडीचा, गौरांग, असा अर्थ आहे; आणि पंढरपुरच्या विठोबाला तर त्याचे प्रेमळ भक्तहि लडिवाळ क्रोधाभासानें काळ्या म्हणून हाका मारतात. परंतु विठोबा हें विष्णुदैवत आहे आणि विठ्ठू हे विष्णुचेंच प्राकृतरूप आहे, ही बाब लक्षांत घेतली व विष्णुदेव गौराग आहे, ह्या गोष्टीशीं मेळ घालूं गेले, म्हणजे पांडुरग हा शब्द पांडु व रंग ह्या दोन संस्कृत शब्दांपासून स्वतंत्र रीतीने निर्माण झालेला आहे, असे कबूल करावे लागतें. एकंदरीत, 'पंडरिगे' पासून पांडुरंग शब्द शास्त्र्यांनी बनवला, ही जी भगवानलालाची कोटी तिला फारसा आधार आहे, असे दिसत नाहीं. पंडरिगे ह्या कानडी शब्दाच्या शेवटला गे काढून टाकला म्हणजे पंडरि असा शब्द रहातो. तो किंचित् कठोर व ठसकेदार उच्चारला म्हणजे पंढरी शब्द तयार होतो. कदाचित् 'पंढरी' ह्या मराठी शब्दाचें कानडी लोकांनी

आपल्या चालीप्रमाणें 'पंडरिगे' बनविलें असेल. 'पंढरी' मूळ, किंवा 'पंडरिगे' मूळ, हा वाद जास्त पुरावा मिळेपर्यंत असाच राहील.

२२. ठ्ठ बद्दल तुसता एकेरी 'ठ' खोदला आहे.

२३. शक ११९५ त विठोबाला भक्तमंडळी श्रीविठ्ठलदेवराय असें प्रेमानें म्हणत. सिहा चतुर्थीचा प्रत्यय त्या कालीं रुढ होता; ला प्रत्यय नव्हता.

२४. हीं चार अक्षरें नीट वाचतां आली नाहींत; किंवा वाचता आली असल्यास अर्थ लागत नाहीं.

२५. चालावेआ म्हणजे चालविण्याकरिता, सतत लावलेजाण्याकरितां, चालणें ह्याचें प्रयोजक चालावणें, चालावणेया असे रूप न करतां चालावेआ असें रूप त्या कालीं करीत. मंगळवेढच्या काशीविश्वेश्वराच्या देवळांतील

२६. भक्तिमाला, तीतील जे लोक ते भक्तिमालि ''भक्तिमालि'' शब्दाचें तृतीयेचे अनेकवचनी रूप भक्तिमालिआं एकवचनी रूप 'भक्तिमालिआ' असें होत असे. 'आ' वर अनुनासिक दिला म्हणजे अनेकवचन होत असे.

२७. पैक = द्रव्य; षष्ठी पैकाचा. पैका असा मूळ शब्द असता तर त्याची षष्ठी 'पैकेयाचा' अशी झाली असती.

२८. विवरु = तपशील

२९. अर्थ :- शक ११९५ श्रीमुख सवत्सरीं फागनिपुरच्या श्रीविठ्ठलदेवरायास फुलें व दांडे यावच्चंद्रदिवाकरौ समर्पण करण्याचें काम चालूं राहण्याकरितां भक्तसमुहांतील नाना व्यक्तींनीं दिलेल्या द्रव्याचा तपशील.

३०. वरील तीन ओळी शिळेच्या सबद लाबीभर खोदल्या आहेत. ह्या चवथ्या ओळीपासून शिळेचे आठ रकाने केलेले आहेत. तिसऱ्या सबंद ओळीच्या खालीं सहा लांब रेषा शिळेच्या तळापर्यंत समांतर काढून सात रकाने विभक्त दाखविलेले आहेत. आठवा रकाना सातव्यापासून लंबरेषेनें विभक्त केलेला नाहीं. त्या रकान्यांतील वर्गणीदारांचीं नावें अतिबारीक अक्षरांनी सातव्या रकान्याच्या पुढें राहिलेल्या शिळेच्या भागांत लिहिलीं आहेत.

३१. मालि म्हणजे भक्तिमालि, भक्तिमालि = भक्तिमालेतील एक इसम

३२. वामैआ शब्दांतील ऐआ हा तेलंगी प्रत्यय आहे. वामय्या असें प्रस्तुतकालीन रूप होईल. वामैआ हें तृतीयेचें एकवचन आहे. आकारांत पुल्लिंगी नाम असल्यामुळें आ प्रत्यय मूळ शब्दाच्या अंत्य 'आं' त लोपून गेला.

३३. षाते = खाते

३४. पैकु = द्रव्य. ओळीचा अर्थ : भक्तिमालेंतल्या वामैआनें दिलेल्या यादींतील द्रव्य.

३५. श्रीपतिद यानें

३६. णाकें = नायकें - णाक (नाईक याअर्थी) शब्द प्रस्तुत कालीं रामणाक, हरणाक, वगैरे अतिशुद्रांच्या नावात मात्र सध्यां राहिला आहे. शक ११९५ त तो सावकारांना व ग्रामाधिपतींना लावीत असें दिसतें. ''श्रीपतिदें णाके'' हे शब्द भगवानलाल इंद्राजीनें

"श्रीपतिदण्णा" असे वाचले. (सोलापूर गझेटियर - पंढरपूर) अर्थ कांहीं एक लागला नाहीं व लागल्यासारखा वाटला तो चुकला, हे उघड आहे. "श्रीपतिदण्णा" असे पद पाडल्यावर, पुढें 'कें' चें काय करावयाचे ते सुचेना. डा. भगवानलालानें ही एक ओळ व पुढील ३१ वी ओळ, अशा दोन ओळी अर्ध्यामुर्ध्या वाचल्या, असें सोलापूर गझेटियरातील वर्णनावरून दिसतें.

३७.'वौ.' हा संक्षेप वौसर ह्या शब्दाचा आहे. वौसर=पुडा किंवा हार.

३८.गांवाचें नांव

३९.हा शब्द शुध्द प्राकृत आहे. बप्प=बप्पक=बापअ=बावअ=बावा=बाबा.

४०.सेणवै=फौजदार. ब्राह्मण, मराठा वगैरे वाटेल त्या चातुर्वर्ण्यातील जातीचा जो कोणी इसम फौजेचा विवक्षित अधिकारी तो सेणवै. कुळांत कोण्या नामांकित पुरुषाने सेणवैपणा केला म्हणजे त्याचे वंशज सेणवै हे आडनांव लावीत. ओळीचा अर्थ उघड आहे. सेणवै ह्याची एकवचनी तृतीया सेणवैएं अशी पाहिजे होती. परंतु, ती येथें केली नाहीं. सेणवैदत्त असा समास केला आहे.

४१.ह्या दोन फुल्याच्या ठिकाणीं "लें." अशीं दोन अक्षरें असावीं.

४२.गंगाधरनायक हे सावकाराचें, सराफाचें, ग्रामाधिपतीचें किंवा अधिकाऱ्याचें नांव. श्रीपतिदनायक व गंगाधरनायक ह्यांच्या नांवापाठीमागें गावाचीं नावे नाहीत. त्या अर्थी राज्यांतील हे कोणी द्रव्यानें किंवा अधिकारानें प्रसिध्द पुरुष आहेत असें दिसते.

४३.विजयपुर ह्या शब्दाचें विजेपुर, बिजेपुर असें प्राकृत रूप होतें. तेव्हां विजापुर ह्या शब्दाचें विजयपुर हे मूळ संस्कृत रूप नव्हे. मूळ सस्कृत रूप विद्यापुर. विद्यापुर=विज्जापुर=विजापुर सध्यांच्या विजापुर शहराच्या ठिकाणी शक ११९५ त विजापुर म्हणून एक मोठेसे गाव होते असें दिसतें. हे गांव मुसुलमानानी बसविलेले नव्हे; त्यांच्या पूर्वीचेच आहे.

४४.गौरुबाहु = गौर आहेत बाहु ज्याचे, एकवचनी तृतीया = गौरुबाहूवा

४५.'फुलें.' हीं अक्षरें मूळांत फुल अशीच आहेत. पुढील शून्य व वरील मात्रा व अनुनासिक यात्रेकरूंनीं पाठी घासघासून गुळगुळीत करून सोडली.

४६.गांवाचे नांव

४७.सेवंतीच्या फुलांची माळ

४८.कोकण्या

४९.'कें' वर अनुनासिक आहे.

५०.गांवाचें नांव

५१."मांइबाइ" व "दामोधर" या दोन शब्दामध्ये 'तथाच' हे शब्द अध्याहृत आहेत. मांइबाइ व दामोधर भट यानी. तृतीयेचे एकवचन = भटें. तृतीयेचें अनेकवचन भटीं.

५२.साहादेव याचें मूळ रूप सहदेव. 'पडितीं' हें बहुमानार्थी तृतीयेचें अनेकवचन आहे.

५३.गांवाचे नांव

५४.देय, देयं, दे। अशी तीन रूपें ह्या शब्दांचीं ह्या शिलालेखात येतात.

५५ 'तुल' हे तुलसीचें संक्षिप्त रूप आहे.
५६ हें आडनांव असावे.
५७ गांवाचें नांव
५८ बामरस हे गांवाचें नांव
५९ ज्योतिषी = जोइसी = जोइसि = जोशी = दोशी (गुजराथी)
६०.नामअय्या = नावअय्या = नावैआ = नावैएं (एकवचनी तृतीया)
६१ आडनांव
६२ ह्या शब्दाची तृतीया केली नाहीं. चल्हादेवीदत्त असा समास केलेला दिसतो. चल्हादेवीआ अशी एकवचनी तृतीया होईल.
६३ विष्णुनायक = विठ्ठुनायक=विठनायक=विठनायको (प्रथमेचें एकवचन) विठनायक, विनायक व देऊबाई ह्या तीन व्यक्तीनी मिळून एक गद्यान दिला. त्याच्या खर्चानें आचंद्रार्क २५ फुलें विठोबाला दररोज देत जावीं; दांडे, वौसर, वगैरे इतर वस्तू देऊ नये.
६४या अक्षरांचा कांहीं एक अर्थ कळला नाहीं. 'सेता' पुढील आकड्याचाहि अर्थ कळला नाहीं.
६५.गांवाचें नांव
६६ कृण्ण = कण्ण = कण्ह = कन्ह = कान्हु (ममतादर्शक)
६७ खेता सो = शंभर खेत. खेत हें एका लहान नाण्याचें नांव असावें.
सो = शंभर
६८.गांवाचें नांव
६९ वर्गणीदाराचें नांव
७०. २३ व्या ओळींच्या खालीं २६ वी ओळ खोदिली आहे. शक ११९६ भावसंवत्सरांत ज्यांनी वर्गणी दिली त्यांची नांवे २६ व्या ओळीपासून दिलेलीं आहेत. परंतु आद्रुसवाडीच्या सोंईदेओ २७ने शक ११९५ त वर्गणी भरली होती. सबब ११९५ च्या खात्यांत त्याचें नाव भरणें जरूर होतें. परतु २३ व २६ या ओळींच्यामध्ये जागा राहिली नव्हती. म्हणून २६ व्या ओळींची अक्षरें लिहून बाकी जी ओळीची पुढील रिकामी जागा राहिली तीवर २४ व २५ ह्या ओळी बारीक अक्षरांनी तिरक्या खोदल्या आहेत व हे नांव मागून लिहिलें हे दर्शविण्याकरिता खात्यात लिहितात त्याप्रमाणे छ्‌ अशी खूण त्या वर्गणीदाराच्या नांवापाठीमागें काढिली.
७१.गावाचें नाव
७२ मालि राघो याच्या द्वारा. मालि=भक्तिमालि राघव=राघो.
७३.शक ११९६ 'संवत्सरे' बद्दल संवछरे असें मराठी रूप खोदलें आहे.
७४.'ज्येष्ठ' बद्दल जेष्ट.
७५.गावाचें नांव आंवढें त्यांत रहाणारा तो आंवढा. आम्र. स्थक= आंवठअ= आंवठा= आंवढा. ग्रामस्थ=गांवठ=गांवढ ग्रामस्थक==गावंठअ=गावठा=गावढा.
७६.जातिदेव=जाइदे ॐ = जाइदेवें (तृतीयेचे एकवचन)

७७.आंबे गावचा रहिवाशी.

७८.दु:स्थ=दोङ्घ=दोंङ्घ (अनुनासिकरणाने)

७९.ग्रामनाम. राम या शब्दाची तृतीया रामेन. रामेण (सस्कृत) त्याचें प्राकृत रामेन. 'न' चें अनुनासिकीकरण होऊन रामें असे रूप मराठींत होई व पद्यांत सध्याहि होतें.

८० ह्या अक्षराचा अर्थ कळला नाहीं; किंवा अक्षरें नीट लागलीं नाहींत.

८१.अक्षरें नीट लागली नाहीत; किवा अर्थ कळत नाही.

८२.'विठल' याची षष्ठी विठलाचा.

८३ अर्थ कळत नाहीं.

८४ अर्थ कळत नाहीं.

८५ अक्षर फुटून गेलें आहे.

८६. द्राम ह्या वर्गणीदारानें गद्यानाच्या ऐवजी द्राम दिले आहेत. दहा द्राम दिले आहेत, त्या अर्थी गद्यानाहून द्राम हें लहान नाणे होतें. कदाचित १० द्राम म्हणजे एक गद्यान होत असेल. गद्यानाची किमत १५ रुपये धरली तर एका द्रामाची किमत १।। रुपया होते.

८७. वृष म्हणजे सोमवार असावा. हा शब्द भगवानलालानें निराळाच काही वाचला आहे.

८८. ''सोडवीकार'' बद्दल भगवानलाल ''यादवीकाल'' म्हणून वाचतो. परंतु तें सर्वस्वीं चूक आहे. ''सोडवीकार'' असाच पाठ आहे. ह्या शिलालेखांतली भगवान लालाने जी दुसरी ओळ वाचिली ती हीच. सोडवी हें गांवाचे नांव आहे. तेथील रहिवाशी जो तो सोडवीकार.

८९ प्रसिध्द हेमाद्रिपंडित. हा रामचद्रदेव जाधवाचा श्रीकरणाधिप.

९०.''बामना'' बद्दल भगवानलाल इंद्राजी ''धामना'' वाचतो. परतु ''बामना'' हाच खरा पाठ आहे. बामना=वामनाला. वामन किवा बामन हें वर्गणी गोळा करणाऱ्याचे किंवा फुलें देणाऱ्या माळ्याचे नांव असावें.

९१. ११९९ ईश्वर संवत्सर, मार्गशीर्ष शुध्द १५ ला शुक्रवार येतो. सकु, ईस्वर, मार्गसिर, सुक्रे, ह्या चार शब्दांतील मूळ शकाराबद्दल सकार आला आहे. कित्येक लेखांत ह्या नियमाप्रमाणें श्री बद्दल स्त्री आढळतो. परंतु प्रस्तुत लेखात श्री असेंच अक्षर आहे.

९२ पांडरी म्हणजे प्रस्तुतकालीन पाढर. फड म्हणजे कचेरी. पांडरीफडमुख्य राज्यांतील सर्व पाढऱ्यांच्या कचेऱ्यांचा अधिपति=ग्रामसंस्थांचा अधिपति.

९३ रामचंद्रदेवाला जादव म्हणून या शिलालेखांत म्हटले आहे. रामचद्राच्या संस्कृत शिलालेखात व ताम्रपटात यादव असा शब्द येईल. श्रीजादवनारायण प्रौढप्रताप चक्रवर्ति हे रामचंद्रदेवाचे बिरुद आहे.

९४.देवराय याचे तृतीयेचें एकवचन देवराएं.

९५ ह्या दोन फुल्यांच्या जागीं कोणती अक्षरें आहेत ते नीट वाचतां आले नाहीं. बहुश: गद्यान किती दिले त्याचा आकडा असावा.

९६ एका प्रकारच्या गद्यानाचें नांव असावें.

९७ गद्यान

९८ क्षेर हें गांवाचे नांव असावें.

९९ बलदेवाच्या बायकोनें

१००.विहीर

१०१.उपायन

१०२.३३ पासून ३६ पर्यंतच्या चार ओळी पहिल्या व दुसऱ्या रकान्याभर खोदल्या आहेत; व त्यांतील अक्षरें वरील ३२ ओळींतील अक्षरांच्या अडीच तीन पट मोठीं आहेत. महाराष्ट्राचा तत्कालीन चक्रवर्ति राजा जो रामचंद्रदेव जादव त्याची देणगी येथें नमूद करावयाची असल्यामुळें, अक्षरें मोठीं व ठळक अशीं लिहून, शिवाय ओळी एकाच रकान्यांत न आटोपतां दोन रकान्यांभर लिहिली आहेत. (१) रामचंद्रराव जाधवाने अमुक गद्यान दिले. (२) त्याच्या सर्वाधिकाऱ्यानें अमुक गद्यान दिले. व (३) बलदेवाच्या बायकोनें एक विहीर दिली. हा बलदेव राजकुळांतील कोणी पुरुष असावा. राजकुळांतील मंडळीची देणगी आहे. सबब श्रीमंगलमहाश्री अशी मंगल शब्दांनी समाप्ति केली आहे.

१०३.आंबे येथील रहिवाश्यानें

१०४ शक ११९६

१०५."श्रीपतिदें" असें नांव ५ व्या ओळींत आलें आहे. त्याचेंच श्रीपतिदेव हें पूर्ण नांव असावें. ह्या श्रीपतिदेवाचें नाव प्रस्तुत शिलालेखांत पाच चार वेळां आले आहे. त्यावरून असे दिसतें कीं हा विठ्ठलाचा मोठा भक्त होता; व ह्याच्याच पुरस्काराने देवाला देणग्यांची वर्गणी जमली होती. हा श्रीपतिदेव सावकार किंवा जहागीरदार किवा सामंत होता असें दिसतें; परंतु निश्चित कोण होता, तें सांगता येत नाही. ह्या श्रीपतिदेवाचे "वक्विवेकारुक" असें एक विशेषण ३९ व्या व ४० व्या ओळींत आलें आहे. त्यावरून हा कोण होता, हें निश्चयानें कळावयाचें. परंतु "वक्विवेकारुक" ह्या शब्दाचा अर्थ मला लागला नाही. अर्थ न लागण्याचे कारण असें की, "वक्विवेकारुके" ह्या शब्दातील दुसरे अक्षर मला नीट वाचतां आलें नाहीं. अनुमानधक्याने तें मी "क्वि" म्हणून वाचले आहे. तें अक्षर जर नीट लागलें तर सबंद शब्दाचा अर्थ बहुशः समाधानकारक लागेल.

१०६.शब्द नीट वाचतां न आल्यामुळे अर्थ लागत नाहीं.

१०७ एका प्रकारचा गद्यान

१०८.एका प्रकारचा गद्यान असावा.

१०९.हा शब्द व त्याचा अर्थ नीट कळत नाहीं.

११०.'महाजन' याचा संक्षेप

१११.चैत्र (सं) = चइत्त (प्रा.+ = चइत किवा चइत्र (मराठी)

११२.गांवाचे नांव.

११३.'मल्ल' याचे ममतादर्शक मल्लु, या पासून मलो + देव = मलोदेव

११४.श्रावण

११५.अक्षरे लागलीं नाहींत.

११६.मागील न लागलेल्या अक्षरांशी संबंध आहे.

११७ तुलसीच हें षष्टीचें एकवचन आहे. तुलसीस्थ=तुलसीच्च=तुलसीच.

११८ सांगवी... रामणुरी हें गांवाचे संयुक्त नांव आहे.

११९ येथे 'केसव' शब्दातील के अनुनासिक केला नाहीं.

१२० येथपासून दुसरा रकाना सुरू. रकान्यांत वर्गणीदारांची जी यादी दिली आहे त्या यादीतील इसमांनी पाटोलामातासुत राघ याजकडे वर्गणी भरली.

१२१ पाटोला नांवाची बाई जिची माता ती पाटोला माता. तिचा मुलगा.

१२२.राघ शब्दाची तृतीया राघेण. 'ण' चा अनुनासिक होऊन राघें असें रूप होतें. शक ११९५ त अकारान्त पुल्लिंगी शब्दांची एकवचनी तृतीया इन किंवा ईं या प्रत्ययांच्या जोडणीनें विकल्पानें होत असे, असें दिसतें. परंतु इन प्रत्यय लागून होणारी तृतीया आस्ते आस्ते लोपत चालली होती.

१२३ पहिल्या रकान्याच्या पांचव्या ओळींत हें नाव "श्रीपतिदेंणाकें" असें आलेलें आहे. येथे ५१ व्या ओळींत "णाकें" च्या ऐवजी "णायकें" असें स्पष्ट आहे.

१२४ दत्ता हे अनेकवचन आहे. परंतु दिलेले गद्यान शून्य आहेत. ५२ व्या व ५४ व्या ओळींतहि दत्ता असे अनेकवचन आहे.

१२५ येथे नायक असे स्पष्ट आहे. ५१ व्या ओळींत णायक आहे. नायक व णायक या दोन हरफांत कांहींतरी भेद आहे, ह्यांत संशय नाही. "श्रीपतिदणाक" किंवा "श्रीपतिदणायक" हा ब्राह्मण नसून मराठा किंवा वैश्य असावा. "गगाधर नायक" ब्राह्मण असावा. "श्रीपतिदणायक" किवा "णाक" ह्याच्या नांवाचा जो रुढ उच्चार होता तोच येथें दिला आहे व देणें जरूर होतें. त्याच्या नांवाचे संस्कृत रूपातर करून भागण्यासारखें नव्हते.

१२६ "लंनु" हे कोणत्या संस्कृतशब्दाचें प्राकृत किंवा मराठी रूप तें समजत नाही. श्रेष्ठी=सेठ्ठी=सेठि=सेठिं (एकवचनी तृतीया)

१२७ रुविल हें गांवाचे नांव असावे. तेथील अधिपति तो रुविलेंद्र.

१२८ व्यक्तिचें नांव.

१२९ प्रतिस्थान = पइठाण = पैठाण = पैठण. पैठण असा उच्चार शक ११९५ च्या आधीं बरींच वर्षे कायम झाला होता.

१३०.चंगदेव = चांगदेव. 'चंगदेव' या शब्दांतील 'च' वर अनुस्वार आहे. चाँगदेव' या शब्दांतील 'चा' वर अनुनासिक आहे.

१३१.गावाचें नांव

१३२.'हेमडी' च्या ऐवजीं हेमाडी असें पाहिजे आहे. पंडित याची एकवचनी तृतीया पंडितें. पंडितीं अशी बहुमानार्थी तृतीया येथे लिहिली नाहीं. कारण कोटौन गावचा हा हेमाडीपडित रामराजाचा श्रीकरणाधिप जो सोडवीकार हेमाडीपडित त्याच्या इतका प्रसिध्द व सर्वमान्य नव्हता.

१३३.तथा = तसेंच कोटौन गावच्या
१३४ 'स्वर' हीं अक्षरें किंचित पुसट झाली आहेत. 'श्वर' बद्दल 'स्वर' खोदलें आहे.
१३५.सिध्द = सिद्ध = सिधु = शिदू (अर्वाचीन मराठी)
१३६ आडनांव असावे.
१३७. लाल हा शब्द त्याकालीं मराठीत होता. लाला असा हिंदीत याच अर्थाचा एक व्यक्तिनामवाचक शब्द प्रस्तुत कालीं आहे.
१३८ गांवाचे नांव
१३९.सालिव गांवांत रहाणाऱ्या
१४०.यादव = यादओ = यादो
१४१ 'सेणवै' शब्दाचें तृतीयेचे एकवचन
१४२.'ईश्वर' या शब्दाचा उच्चार शक ११९५ त 'इस्वर' करीत. महाराष्ट्रातील गांवढे सध्याहि 'इस्वर' असाच उच्चार करितात. इस्वरस्वामी हा मनुष्य कानडी किंवा तेलगु कुळांतला असून महाराष्ट्रात बऱ्याच पिढ्या राहिलेला दिसतो.
१४३.धदावाचक शब्द.
१४४ गावाचे नांव 'आंवढा' असा शब्द २७ व्या ओळींत आला आहे. त्याचाच हा दुसरा हरफ आहे.
१४५ राशि = रासि = रास
१४६.गांवाचे नांव
१४७.जंतोवि माय ज्याची तो जंतोविमाय. (एकवचनी तृतीया) जतोविमाएं. जंतोवि हें कोणत्या संस्कृत शब्दाचे प्राकृत रूप न कळे.
१४८.गांवाचें नाव
१४९ पदुमै हें व्यक्तीचें नांव.
१५० हयवाहअय्या = हयकवाहय्या = हयोवाहया. तृतीया न करतां समासच केला आहे.
१५१.शक ११९८ धाता, मार्गशीर्ष वद्य ५ स रविवार येतो.
१५२ 'राऊ' किंवा 'राऊँ' याचे चतुर्थीचें एकवचन रावा. रावा अर्थे = रावाकरितां.
१५३.दडा = दाड. येथे दांडाच्या मागून अर्ध्या गद्यानाचा उल्लेख केला आहे.
१५४ पाव, अर्धा, पाऊण, सवा, दीड वगैरे करितां।, ।।, ।।।, १।, १।। अशा खुणा शक ११९५ त होत्या म्हणजे रेघानी चातुर्थिक अपूर्णांक दर्शविण्याची त्या कालीं चाल होती.
१५५ गुरु (प्रथमा, एकवचन); गुरुवें (तृतीया एकवचन)
१५६ वाटदेव = वाडदेव
१५७.'चगदेव' या शब्दात 'च' वर अनुस्वार आहे. (१) वाडदेव गुरु (२) वाजसनेय सुत व (३) चंगदेवसुत ह्या तिघांनी मिळून.
१५८.धष्ट म्हणजे एक प्रकारचा गद्यान.
१५९ येथें गद्याण असा सबद शब्द आला आहे. आतापर्यंत ग असा सक्षेप येत होता.

१६० ७२।७३।७४ ह्या ओळीच्या शेवटलीं "जैतको", "वे + ता", "लपुमा हीं अक्षरे काय अर्थाचीं ते कळत नाहीं.

१६१.लपुविदेव हें व्यक्तीचे नांव.

१६२ मांईदेव हे व्यक्तीचें नांव. येथे "मा" वर अनुनासिक दिला आहे.

१६३ "आपदेव" या शब्दाचे मराठी आपदे; त्याचें तृतीयेचें एकवचन आपदें

१६४."पावीखोता' व "रणेरा" या दोन शब्दाचे अर्थ कळत नाहींत किंवा अक्षरें नीट लागली नाहीत.

१६५ घोडा गद्यान म्हणून एका प्रकारचा गद्यान.

१६६ विठोबाच्या ११९५ तल्या देवळाच्या जवळच 'शिवनाथ' नांवाचे लिंग होतें. हें लिग मुसुल्मानांनी फोडलें. तेव्हा लिंगाला भोक पडले, तें अद्याप आहे.

भोक फार खोल आहे व त्याच्याखाली भुयार आहे, असें सांगतात. सिवनाथा (चतुर्थी एकवचनी)

१६७ बोनें = नैवेद्याचा खाद्य पदार्थ

१६८ साती = सातू

१६९ 'पा.' हा सक्षेप 'पाव' याचा आहे. शेराचा पाव की कशाचा पाव तें स्पष्ट होत नाही.

१७०.'+ हेपडि' या अक्षराचा अर्थ लागत नाहीं.

१७१ कोटार = कोठार = कोष्टगृह = खाद्यपि द्रव्याचें संग्रहस्थान. तेथील व्यवस्थापक जो तो कोठारी.

१७२ ठाकवी = फसवी

१७३ तेयासि=त्यासि 'तेयासि' 'जेयासि' वगैरे रूपे मजजवळील ज्ञानेश्वरीत नित्याने येतात.

१७४.'विठल' या शब्दाची स्त्रीलिंगी षष्ठी 'विठलाची'

१७५ आण = शपथ आज्ञा = आण्णा = आण आण याचा मूळ अर्थ हुकूम असा होतो. तो सध्या शपथ असा झाला आहे.

१७६ सातू, गहू व तूप हे जिन्नस पावशेर पावशेर देण्यात जो कोठारी फसवील त्याला श्री विठ्ठलाची शपथ आहे, असा ह्या वाक्याचा अर्थ आहे. ह्या वाक्यांत ठाकवी हें क्रियापद आलें आहे व तेयासि हे सर्वनाम आलें आहे. नाम, सर्वनाम, क्रियापद, ह्या तीन घटकांनी बनलेले असें वाक्य ह्या शिलालेखात हे एवढें एकच आहे. "श्रीसिवनाथा" या शब्दापासून 'आण' या शब्दापर्यंत जे वाक्य आहे ते शक ११९५ तील मराठी वाक्य कसे असे तें उत्तम दाखवितें. ह्या वाक्यातल्या रूपासारखीं रूपें ज्या ग्रंथांत येतील तो ग्रंथ शक ११९५ च्या सुमारचा खरा. मजजवळील ज्ञानेश्वरीतल्या वाक्यांतील शब्दांची रूपे अशीच आहेत. नामदेवाच्या अभंगातही अशीच रूपें असली पाहिजेत. परंतु सध्या जे नामदेवाचे अभंग छापलेले मिळतात त्यात ही रूपें (विशेषतः क्रियापदांची व सर्वनामांची) नाहीत अर्थात् हे अभंग जसे मूळांत नामदेवानें म्हटले तसे छापलेले नाही.

१७७. ३२ व्या ओळीवर 'पंडीतीं'' असे हरफ आले आहेत.

१७८. ५० व्या ओळीवर "पाटोलामातासुत राघेण" असे शब्द आले आहेत. तेथला राघ व प्रस्तुत पंक्तींतील राघ एकच होत.
१७९. "आहे" हें एक प्रकारच्या झाडाचे नांव असावे.
१८० "फुला" पुढें कांही तरी मजकूर लिहावयाचा राहिला आहे असें वाटते.
१८१. "बाई"ची एकवचनी तृतीया "बाईआ"
१८२ गोइंद = गोविंद
१८३ श्रेष्ठिआवलि = सेठिआवलि = सेठिवल = सेठवल = सावकारांच्या वर्गातील एक.
१८४.खातेदाराचे नांव पुसलें जाऊन दुर्बोध झालें आहे.
१८५ हे नांव पहिल्या व दुसऱ्या रकान्यात आलें आहे.
१८६ हें नांव ७ व्या व ५२ व्या ओळींवर आले आहे. हाहि गृहस्थ श्रीपति देवासारखाच श्रीमान व प्रमुख दिसतो.
१८७ वासु (देव) = वासुक = वासक
१८८ तेलगू नांव
१८९.शेतकऱ्यानें हलिक = हलिअ = हल्या (पशु)
१९०.'एसर' हें गावाचें नांव.
१९१.'नरहरि' ची एकवचनी तृतीया "नरहरिएँ"
१९२.'सि' अनुनासिक केली आहे. "सिवैआ" ची एकवचनी तृतीया "सिंवैएं"
१९३.गांवाचे नांव.
१९४."तानुबाहूणा" याची एकवचनी तृतीया. तानुबाहू+अण्णा = तानुबाहूण्णा = तानुबाहुणा = (एकवचनी तृतीया) तानुबाहूणें ८ व्या ओळींत "गौरुबाहूवा" असें रूप आलें आहे.
१९५ देशांचे व लोकांचे नांव.
१९६.सांय गांवचा राहणारा.
१९७ बोप हे नांव बोपदेव, बोपसेठी, वगैरे शब्दांत शक ११९५ त व तत्पूर्वी मराठीत होतें.
१९८ गांवाचे नांव
१९९.इन प्रत्यय लावून एकवचनी तृतीया केली आहे.
२०० हें नाव ५६ व्या ओळींत आलें आहे.
२०१.गांवाचे नांव.
२०२."पंडि" हीं अक्षरे दोनदां पडलीं आहेत; व जागा न राहिल्यामुळें "दत्त" हीं अक्षरें खोदतां आलीं नाहींत.
२०३.आडनाव.
२०४.नारण=नारायण नारायण + अण्णा = नारायणा = नारणण्णा = नाराणना (अशुध्द परंतु लौकिक) किंवा नारायण नायक याचा सक्षेप नारणना असूं शकेल.
२०५ आडनाव गांवावरून.

२०६ "सेठवल" प्रमाणे "जैजवल" जैजवल = जयजय आवलि = जैजैवल = जैजवल
२०७.कायस्थ = कायथ = कायत = कायतु
२०८ "सग" हें व्यक्तीचे नांव आहे.
२०९ हलीककि = शेतकरी. (एकवचनी तृतीया) हलीककीए
२१० तसेंच
२११. गांवाचे नांव असावें. जगद्देव = जगुदेव.
२१२ अर्थ कळत नाहीं.
२१३ प्रतिपदीं = प्रतिवदीं
२१४ पुष्पास नांवाच्या फुलांची माळा.
२१५ व्यक्तिचें नांव.
२१६ "सोनेडा+" हे गांवाचे नांव. तेथील राहणारा जो तो सोनेडा+कर.
२१७ पारै गांवचा रहाणारा तो पारैकार.
२१८ राकण्णा = राकणा = (एकवचनी तृतीया) राकणे.
२१९ ग्रामनांव.
२२० ग्रामनांव.
२२१ पुरुषनाम
२२२ ग्रामनांव हा शब्द १४ व्या ओळीवर आला आहे.
२२३ "सेणवै" ची एकवचनी तृतीया "सेणवैआ" इतरत्र "सेणवैएं" असे रूप आलें आहे.
२२४ सहज
२२५ पुरुषनाम.
२२६.एकंदर.
२२७ छ् ही खूण टीपेची आहे.
२२८ हे नांव ८० व्या ओळींत आलें आहे.
२२९ स्त्रीचें नांव. विनायकाचें स्त्रीलिंग विनायकी
२३०.वीर + आर्यी = वीरार्यी = वीरायी = वीराई. "आर्य"चे स्त्रीलिंग आर्या असें पाणिनीय संस्कृतांत होतें. परंतु "आर्यी" असेंहि एक रूप असावें; व तें संस्कृतांत लुप्त होऊन प्राकृतांत ह्मणजे विशेषतः जुन्या मध्ययुगीन मराठींत राहिलें. वीराइया (एकवचनी तृतीया)
२३१ द्रम्म = दाम
२३२ हा शब्द ८१ व्या ओळींत आला आहे.
२३३.११७/११८/११९ ह्या तीन ओळीतल्या शब्दांचा अर्थ लागत नाही.
२३४.अक्षर पुसटून गेलें आहे.
२३५.सेवंती

२३६ वैदिक तऱ्हेवर 'च' चा उच्चार 'चा' केला आहे.

२३७ ग्रामनांव.

२३८ ग्रामनाव.

२३९.अर्थ लागत नाहीं.

२४० पुरुषाचे नांव. "मालीमालासि" हें "मालीमाल" याचे चतुर्थीचें एकवचनी रूप.

२४१ "वैजाहस" पुरुषाचें नांव; (एकवचनी तृतीया) वैजहसिं

२४२.हा शब्द तिसऱ्या ओळींत "वालावेआ" असा आला आहे. तो मी तेथें "चालावेआ" असा वाचला आहे. तेथलें हें माझें वाचणें जर बराबर असेल तर येथेहि "चलावेआ' असें वाचणें जरूर आहे. परंतु दोन्हीं स्थलीं 'वा' आणि 'व' हीं अक्षरें स्पष्ट आहेत. शिलालेखात 'च' कधीं कधीं 'व' सारखा दिसतो, हें खरें आहे. परंतु, येथें दोन्ही ठिकाणी शंकेला जागा नाहीं. 'व' स्पष्ट दिसत आहे.

२४३.ह्या पुढील अक्षरें पुसून गेली आहे.

२४४.जाठौमा हें स्त्रीचें नांव. जाठो+अम्मा (आवा) = जाठौमा. तिचा मुलगा जो तो जाठौमासुत.

२४५.पुरुषनाम. वक्ष=वक्ख=वाख=वाखें (एकवचनी तृतीया)

२४६.हा शब्द ६५ व्या ओळीत आला आहे.

२४७.हे नांव मागें अनेक वेळा आलें आहे.

२४८ ग्रामनाम

२४९ ग्रामनाम

२५०."पुल" ची एकवचनी तृतीया.

२५१ ग्रामनांव.

२५२.भाहूदेव=भाहूदे=भाहूदें (एकवचनी तृतीया) "भाहूदें" अशी वस्तुत: एकवचनी तृतीया व्हावयाची. एक मात्रा जास्त दिली आहे. बहुमानार्थी आहे.

२५३ ग्रामनाम

२५४ येथें 'खे' असें अक्षर असावें. 'खेड' हें ज्याचे अंत्य अक्षरद्वय आहे असें ग्रामनाम.

२५५ ग्रामनाम

२५६.विद्वत्सभा.

२५७.एक अक्षर गेलें आहे.

२५८.पुरुषनाम, एकवचनी तृतीया.

२५९.हें नांव ११७ व्या ओळींत आलें आहे.

२६० श्रीकरणाधिपाच्या कचेरीतील कारकून. हे आडनाव प्रभू लोकांत अद्यपिहि आहे.

२६१ बहुमानार्थी तृतीया.

२६२ एकवचनी तृतीया.

२६३. राम+अण्णा = रामण्णा = रामंणा. रामणा + देव = रामंणदेव एकवचनी चतुर्थी रामंणदेवा.

२६४.पुरुषनाम

२६५ हे अक्षर पुसून गेलें आहे.

२६६ १७ व्या ओळीत "बामरसाचा" असा शब्द आला आहे. येथें बागरसै असा शब्द आहे. कदाचित 'म' 'ग' सारखा दिसून पाठ बामरस असा वाचला जाण्याचा संभव आहे. बागरसै = बागरसाचा.

२६७ करणिक = कुळकरणी. शक ११९५ त कुळकरण्याला करणिक म्हणत असावे.

२६८ अक्षर पुसून गेले आहे.

२६९ पंडित याचे ऱ्हस्वत्वदर्शक रूप पंडितक.

२७० अक्षरें पुसून गेलीं आहेत.

२७१. गरजमाच हे गांवाचें नाव. डोंगराच्या माचीवर वसलेले म्हणून गरजमाच.

२७२ राहणाऱ्यांनी

२७३ गी हा कोण्यातरी शब्दाचा संक्षेप आहे.

२७४ कोकणच्या रहाणारा तो कोकणा. ह्या शब्दाची एकवचनी तृतीया कोकणा अशीच केली आहे.

२७५ केशवदेव = केसवदे = केसदे = केषदे = (एकवचनी तृतीया) केषदें.

२७६ पुरुषनाम

२७७.ग्रामनाम

२७८ बहुशः तेलगु नांव असावे.

२७९ येथे गावाचें नांव पुरुषाच्या नांवापुढें आलें आहे.

२८० ग्रामनाम.

२८१ ९६ व्या ओळींत "नारणना" असा शब्द आला आहे. तो "नारणनायक" यांचा संक्षेप आहे. नारायण याचें ऱ्हस्वरूप नार. नार+अण्णा = नारण्णा = नारण्ण = नारण.

२८२ हें ग्रामनाम १९२ व्या ओळीवर आलें आहे.

२८३ जातदेव = जाअदे ॐ = जादे = (एकवचनी तृतीया) जादेएं.

२८४ स्थामि = ठामि.

२८५ ग्रामनाम.

२८६ ग्रामनाम.

२८७ पुरुषनाम

२८८.ग्रामनाम

२८९.पुरुषनाम

२९०.पुरुषनाम

२३६ वैदिक तऱ्हेवर 'च' चा उच्चार 'चा' केला आहे.

२३७ ग्रामनांव.

२३८ ग्रामनांव.

२३९.अर्थ लागत नाहीं.

२४० पुरुषाचे नांव. ''मालीमालासि'' हें ''मालीमाल'' याचें चतुर्थीचें एकवचनी रूप.

२४१.''वैजाहस'' पुरुषाचें नांव; (एकवचनी तृतीया) वैजहसिं

२४२.हा शब्द तिसऱ्या ओळींत ''वालावेआ'' असा आला आहे. तो मी तेथें ''चालावेआ'' असा वाचला आहे. तेथलें हें माझें वाचणें जर बरावर असेल तर येथेहि ''चलावेआ' असे वाचणें जरूर आहे. परंतु दोन्हीं स्थलीं 'वा' आणि 'व' हीं अक्षरें स्पष्ट आहेत. शिलालेखांत 'च' कधीं कधीं 'व' सारखा दिसतो, हें खरें आहे. परंतु, येथें दोन्ही ठिकाणी शंकेला जागा नाहीं. 'व' स्पष्ट दिसत आहे.

२४३.ह्या पुढील अक्षरें पुसून गेली आहे.

२४४.जाठौमा हे स्त्रीचें नांव. जाठो+अम्मा (आवा) = जाठौमा. तिचा मुलगा जो तो जाठौमासुत.

२४५.पुरुषनाम. वक्ष=वख्ख=वाख=वाखें (एकवचनी तृतीया)

२४६.हा शब्द ६५ व्या ओळींत आला आहे.

२४७.हे नांव मागें अनेक वेळा आलें आहे.

२४८ ग्रामनाम

२४९.ग्रामनाम

२५०.''पुल'' ची एकवचनी तृतीया.

२५१.ग्रामनांव.

२५२ भाहूदेव=भाहूदे=भाहूदें (एकवचनी तृतीया) ''भाहूदें'' अशी वस्तुतः एकवचनी तृतीया व्हावयाची. एक मात्रा जास्त दिली आहे. बहुमानार्थी आहे.

२५३ ग्रामनाम

२५४.येथें 'खे' असें अक्षर असावें. 'खेड' हें ज्याचें अंत्य अक्षरद्वय आहे असें ग्रामनाम.

२५५.ग्रामनाम

२५६.विद्वत्सभा.

२५७.एक अक्षर गेलें आहे.

२५८ पुरुषनाम, एकवचनी तृतीया.

२५९.हें नांव ११७ व्या ओळींत आलें आहे.

२६० श्रीकरणाधिपाच्या कचेरीतील कारकून. हे आडनाव प्रभू लोकांत अद्यपिहि आहे.

२६१ बहुमानार्थी तृतीया.

२६२.एकवचनी तृतीया.

२६३. राम+अण्णा = रामण्णा = रामंणा. रामंणा + देव = रामंणदेव एकवचनी चतुर्थी रामणदेवा.

२६४ पुरुषनाम

२६५ हे अक्षर पुसून गेलें आहे.

२६६ १७ व्या ओळींत "बामरसाचा" असा शब्द आला आहे. येथें बागरसै असा शब्द आहे. कदाचित 'म' 'ग' सारखा दिसून पाठ बामरस असा वाचला जाण्याचा संभव आहे. बागरसै = बागरसाचा.

२६७ करणिक = कुळकरणी. शक ११९५ त कुळकरण्याला करणिक म्हणत असावे.

२६८ अक्षर पुसून गेले आहे.

२६९ पंडित याचें ऱ्हस्वत्वदर्शक रूप पंडितक.

२७० अक्षरें पुसून गेलीं आहेत.

२७१ गरजमाच हे गावाचें नांव. डोंगराच्या माचीवर वसलेले म्हणून गरजमाच.

२७२ राहणाऱ्यांनी

२७३ गी हा कोण्यातरी शब्दाचा सक्षेप आहे.

२७४ कोंकणच्या रहाणारा तो कोकणा. ह्या शब्दाची एकवचनी तृतीया कोंकणा अशीच केली आहे.

२७५ केशवदेव = केसवदे = केसदे = केषदे = (एकवचनी तृतीया) केषदे.

२७६ पुरुषनाम

२७७ ग्रामनाम

२७८ बहुशः तेलगु नांव असावे.

२७९ येथें गांवाचें नांव पुरुषाच्या नांवापुढे आलें आहे.

२८० ग्रामनाम.

२८१ ९६ व्या ओळींत "नारणना" असा शब्द आला आहे. तो "नारणनायक" यांचा संक्षेप आहे. नारायण याचें ऱ्हस्वरूप नार. नार+अण्णा = नारण्णा = नारण्ण = नारण.

२८२ हें ग्रामनाम १९२ व्या ओळीवर आलें आहे.

२८३ जातदेव = जाअदे ॐ = जादे = (एकवचनी तृतीया) जादेएं.

२८४ स्थामि = ठामि.

२८५ ग्रामनाम.

२८६ ग्रामनाम.

२८७. पुरुषनाम

२८८. ग्रामनाम

२८९. पुरुषनाम

२९० पुरुषनाम

२९१.शब्दाचा अर्थ संदिग्ध
२९२.जाठोआ इचा मुलगा
२९३.पुरुषनाम
२९४.पुरुषनाम
२९५ आडनांव
२९६ पुरुषनाम
२९७ स्त्रीनाम
२९८ पुरुषनाम कृष्ण=कान=कानोवा=कानौआ
२९९ पुरुषनाम
३०० एक प्रकारचा गद्यान
३०१.कलिंद गांवचा राहणारा तो कालिंद
३०२.''मालेन'' ही ''मालो'' ची एकवचनी तृतीया
३०३.पुरुषनाम
३०४.लषुबा=लखुबा=लखुबाया (एकवचनी तृतीया) -
३०५.ग्रामनाम
३०६ आप+अण्णा = आपण्णा = आपण्णें = आपंणें (एकवचनी तृतीया)
३०७ पुरुषनाम ''माहादेव' ह्या शब्दाहून निराळा 'महदेव' शब्द आहे.
३०८ ग्रामनाम
३०९.आडनांव हे आडनांव अद्यापहि आहे.
३१०.पुरुषनाम
३११.ग्रामनाम
३१२.लक्ष्मी-लषुमी=लषुमीए (एकवचनी तृतीया) पुरुषनाम
३१३.एक अक्षर पुसटले आहे.
३१४.भिक्षुदेव=भिकुदेव=भिऊदेव=भिवुदेव.
३१५.कालरक=कालरग=कालरगें (कालर गांवचा रहाणाऱ्यानें)
३१६ ग्रामनाम
३१७ पुरुषनाम
३१८.पुरुषनाम
३१९.मैरेय गावातील रहाणारा.
३२०.पुरुषनाम
३२१.ग्रामनाम
३२२.पुरुषनाम
३२३ हा शब्द ह्या एकाच स्थळीं आला आहे. दलपति=दलवइ=दलवै=सैन्याचा अधिकारी.

३२४ पुरुषनाम
३२५ ग्रामनाम
३२६ हस्तिदेव = हत्तीदेव
३२७ शक ११९८
३२८ 'केशव' याचें शक ११९८ तील उकारान्त रूप 'केशवु.'
३२९ ग्रामनाम
३३० उपास्तिदेव
३३१. काना काढलेला नाहीं. – –
३३२.आषाढ असें पाहिजे
३३३ तृतीया केली नाहीं.
३३४ पुरुषनाम.तृतीया.
३३५ मालिमालो ची तृतीया मालिमालोआ = मालिमालोवा.
३३६ पैकु=द्रव्य हे एक लहानसें नवें खातें आहे.
३३७ ग्रामनाम. ३३८ पुरुषनाम
३३९.२०१ ओळीवर ब आहे.
३४०.मागे अनेक वेळा वर्गणी देणारा श्रीपतिदेव नायक
३४१.लक्ष्मण=लाखण=लख=लखु
३४२.''मालिमालो'' बद्दल संक्षेप
३४३ पुरुषनाम
३४४.आडनांव.
३४५ श्रेष्टी = सेट्ठी = सेट्ठ = सेट्ठे (बहुमानार्थी) = सेट्ठेया (तृतीया)
३४६.पुरुषनाम
३४७ ब्रह्मी = बम्मी = बामी = बामि
३४८.एकवचनी तृतीया
३४९.पुरुषनाम
३५०.ग्रामनाम
३५१ ग्रामनाम
३५२ पुरुषनाम
३५३.दोन अक्षरें गेली आहेत.
३५४ २ या आंकड्याचा अर्थ दोन भमतिज नांवाचे मनुष्य.
३५५ शक ११९६
३५६.उभेमार्ग गावचें रहाणारे उभाघर या नांवाचा गांव हर्णेजवळ आहे.
३५७.शक ११९६

३५८ पुरुषनाम
३५९.साहो गांवचा रहाणारा (एकवचनी तृतीया) साहोए, साहोये
३६०.बहुमानार्थी तृतीया. श्रीपतिदें असें इतरत्र रूप आहे.
३६१ तृतीया न करतां समास केला आहे.
३६२ धाता, शक ११९८
३६३.सुलिम गावचा राहणारा तो सुलिमकर
३६४. 'न' खोदावयाचा राहिला आहे.
३६५ तपो काडबांग हें गांवाचें नांव.
३६६ एकदेव + अण्णा = एकदेवण्णा = एकदेवण = एकदेवणें (एकवचनी तृतीया) = १ देवंणे.
३६७ पुष्पनाम
३६८.झांव मुकजे गांवचा रहाणारा.
३६९.लक्ष्मणि = लषण्णि = लखण्मि.
३७०.ग्रामनाम
३७१ बादेव + अण्णा = बादेवण्णा = बादेवण = बादेवंणे (ए. तृ.)
३७२.अर्थ लागत नाहीं.
३७३ बवकरणे
३७४ ग्रामनाम
३७५ ग्रामनाम
३७६ ही सबंद ओळ लागली नाहीं.
३७७ हा वर्गणीचें खाते ठेवणारा एक गृहस्थ.
३७८ पुरुषनाम.
३७९ कतवरम गांवांत रहाणारा तो कवतरम (ए.तृ.) कतवरमें.
३८० लाट = लाड. लाट देशांत रहाणारा तो लाड.
३८१.नाराष नदीच्या तटावर असणाऱ्या कालुगांवांत रहाणाऱ्यानें
३८२.'कारातें' पासून 'सुवता' पर्यंत व्यक्तीचें वर्णनात्मक नाम.
३८३ समंध = विषय, प्रात.
३८४ वेदस प्रांतांतील सीमुषेण गांव
३८५.ग्रामनाम
३८६ पुरुषनाम
३८७ आम्र अण्णा = आम्रण्णा = आमण्णा = आमंण. तृतीया केली नाही.
३८८ ग्रामनाम
३८९.पुरुषनाम (ए.तृ.)

३९० समास
३९१ ग्रामनाम
३९२.आडनांव
३९३ पुरुषनाम
३९४ पुरुषनाम
३९५.'सां' च्या पाठीमागें कांहीं तरी अक्षर असावें
३९६ ग्रामनाम
३९७ कान्हो राईआपा हे कानडी नांव आहे.
३९८ वेंकु + अण्णा = वेंकुण्णा = वेंकुण.
३९९.स्त्रीनाम
४०० पुरुषनाम
४०१ हेमविलवाहूसुत = हेमविलवाहूचा मुलगा
४०२ म्हालेय + आपा = म्हालेयापा
४०३ ह्यौसालेश्वर = ह्यौसालेसर = ह्यौसालेसरा (ए. तृ.)
४०४ ग्रामनाम
४०५ 'सेव' बद्दल या फुल्या आहेत. अक्षरें पुसून गेलीं आहेत. पुढल्या ओळींतील 'ती' सुध्दां ''सेवती'' असा शब्द होतो.
४०६.दे हा देआचा सक्षेप.
४०७ मालि लक्ष्मणसुत सवता; त्याचा मुलगा पेईदेव
४०८ ओळ लागली नाहीं.
४०९ ओळ लागली नाहीं.
४१०.ओळीचा पूर्वभाग लागला नाहीं.
४११ दोखटे गांवचा रहाणारा.
४१२ देमो हें पुरुषाचे नांव
४१३ येथे गद्यान वगैरे चाली प्रमाणें मजकूर खोदावयाचा राहिला आहे.
४१४ हा रकाना फार बारीक अक्षरांनी सातव्या रकान्याच्या कोपऱ्यावर खोदला आहे.
४१५.माधव मवाहआ यानें
४१६ गणसेण = गणसेन
४१७ गधाण=गद्यान
४१८.''एल्लुबाई'' ची एकवचनी तृतीया.
४१९.पुढील शब्द फुटून गेले आहेत.

♦ ♦